# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १३-०१-२०१५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक १३ जानेवारी २०१५ (का.प.क्र .३५) मा.महापौर सौ. कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२-५० वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.एम.ए पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स. श्री. विजय लक्ष्मण वाघचौरे
३. स.स. श्री. किशोर बाबुराव नागरे
४. स.स.श्री. रावसाहेब धोंडीराम गायकवाड
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१६. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
२०. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२१. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत

२२. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२३. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
२४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२५. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२६. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास
२७. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
२८. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२९. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३०. स.स.श्री.झाकेर बेग मिर्झा सलीम बेग
३१. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३२. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३३. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३४. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३५. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
३६. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३७. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
३८. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
३९. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४०. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४१. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४५. स.स.डॉ. खान जफर अहेमद
४६. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४७. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४८. स.स.श्री.खान आगा मिया खान
४९. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५०. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५१. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५२. स.स.श्री. बबन पंडीतराव नरवडे

५३. स.स.श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

५४. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत

५५. स.स.श्री. तुपे त्रिंबक गणपतराव

५६. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे

५७. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव

५८. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

५९. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर

६०. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल

६१. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान

६२. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे

६३. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर

६४. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने

६५. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

६६. स.स.श्री. सुशिल तुकाराम खेडकर

६७. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव

६८. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश

६९. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

७०. स.स.श्री.खान अक्रम करीम खान

७१. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार

७२. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन

७३. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

७४. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

१. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
२. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
३. श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.रेणुकादास वैद्य : शिवसेनेचे आमदार श्री.प्रकाश बाळा सावंत यांचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.सुशिल खेडकर : यास अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व.बाळा सावंत यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**<u>विषय क्रमांक ६८७:-</u>**

समांतर जलवाहिनी अंतर्गत शहरातील पाणी वितरण व्यवस्था व पाणीपट्टी बील संदर्भात विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**सुचक :-** सौ. उर्मिला नितीन चित्ते, श्री.अनिल मकरीये

**अनुमोदक :-** सौ.प्रिती तोतला, श्री.सुरेंद्र कुलकर्णी.

संवाद :-

श्री.मुजीब खान :सभागृहाचे कामकाज नियमावली नुसार मराठीतून चालते. परंतु स.सदस्यांना जो करारनामा दिला ते इंग्रजी भाषेत आहे. यातून स.सदस्यांना सुचना मांडता येणार नाही. मराठीत करारनामा दिला नाही.

या वेळी डायस समोर एकाच वेळी अनेक स.सदस्य बोलत असतात.

मा.महापौर : शहरात पाणीप्रश्न निर्माण झाला आपल्या आग्रहाने ही सभा आयोजित केली.प्रत्येक स.सदस्यांनी शांततेत चर्चा करावी.

श्री.प्रमोद राठोड :समांतर लाईनच्या संदर्भात बैठक आयोजित केल्याबध्दल सभागृहाच्या वतीने आपणास धन्यवाद,

श्री.अफसर खान :समांतर जलवाहीनीसाठी नियुक्त एजन्सी जायकवाडी ते शहरापर्यंत पाईप लाईन टाकून देणार त्यानंतर ही योजना हस्तांतर केल्यानंतर कंपनी वसुली करणार असे ठरले होते त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही तोच कंपनीने वसुली करण्याचे काम सुरू केले.

मा.उपमहापौर :जे मुद्दे असतील ते मांडावे प्रशासन समजावून घेतील त्यानंतर खुलासा होईल.

श्री.अफसर खान :शहरापर्यंत पाणी आले नाही. ३० दिवस पाणी दिले जाईल त्यानंतर युटिलीटी कंपनी वसुलीचे काम करणार होते. कंपनीचे लोक वसुली करतांना दादागिरी करीत लोकांना मारहाण करतात हे प्रत्यक्ष अनुभवले, पेपरला सुध्दा तशा बातम्या येत आहे.

मा.महापौर :सभागृहात प्रेझेन्टेशन करण्याकरीता व्यवस्था केली आहे त्यावरून माहिती समजून घ्यावी त्यानंतर आपले जे प्रश्न असतील ते मांडावे.

श्री.अफसर खान : सर्वत्र समांतरचीच चर्चा आहे या कंपनीला दरमहा ५.२५ कोटी कशाचे दिले जाते कर्मचाऱ्यांचे पगार, लाईट बील मनपाच देते. हे सर्व कशासाठी करतो? काम होत नव्हते तर कंपनीने कशाला टेंडर घेतले? का एवढी मोठी रक्कम कंपनीला देतो? सविस्तर माहिती देण्यात यावी?

मा.महापौर :आजची सभा आपण सविस्तर चर्चा करण्यासाठी आयोजित कली अगोदर प्रेझेन्टेशन ऐकूण घ्यावे. त्यानंतर चर्चा करावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अफसर खान :आम्हाला सुध्दा जनतेच्या प्रश्नावर चर्चा करायची,सर्व समोर येईल.या योजनेचा बोजा जनतेवर पडणार यास कोण जबाबदार असणार आहे. जवळपास २५८१ कोटीचा जनतेवर बोजा पडणार आहे.

मा.उपमहापौर :अगोदर प्रेझेन्टेशन करू दयावे त्यानंतर काय सुचना करता येतील त्या कराव्यात त्यानंतर माहिती घेतली जाईल.

या वेळी डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात स्पष्ट ऐकू येत नाही.

श्री.अफसर खान :जनतेवर बोजा पडणार आहे. पाणीपट्टीत वाढ केली कुणाच्या अधिकारात हस्तांतर केले? कंपनी कोणत्याही कागदावर सही करून देत आहे १०% कोणत्या अधिकरात वाढवुन दिले? नळ कनेक्शन रेग्युलर करीता ४१५० वसुल करीत आहे ती रक्कम मनापाच्या नावे आलेली २८ कोटी कंपनीने वसुल केले.

श्री.मुजीब खान :प्रेझेन्टेशनमध्ये काय दाखवणार आहे यात नवीन काही नाही चर्चा करावी योग्य निर्णय व्हावे.

श्री.अफसर खान :संमातर एजन्सी वसुलीचे काम करीत आहे जोपर्यंत पाईप लाईन होत नाही तोपर्यत ही योजना मनपाकडे घ्यावी व वसुली महापालिकेने करावी.

श्री.हुशारसींग चव्हाण :सभागृहाचे कामकाज कोणत्या भाषेतून चालवायला पाहिजे खुलासा घ्यावा.

मा.महापौर :प्रेझेन्टेशन बघुन घ्यावे त्यानंतर ज्या सुचना असतील त्या स.सदस्यांनी माडाव्यात.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापुर्वीही पावर पॉईन्ट प्रेझेन्टेशन दाखविण्यात आले होते. करारनामा केला जनतेच्या हिताचा नाही सभागृहाचा वेळ वाया घालू नये दिशाभूल केली जाते. ते होऊ नये.

या वेळी मोठमोठयाने स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.जगदीश सिध्द :प्रेझेन्टेशन कशासाठी दाखवित आहे.यापुर्वी अनेकदा दाखविलेले आहे.

मा.महापौर :१० मिनिटाचे प्रेझेन्टेशन आहे ते बघून घ्यावे त्यानंतर ज्या सुचना असतील त्या मांडाव्या.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रेझेन्टेशन दाखवावे त्यानुसार स.सदस्य सुचना करतील.आपल्या ज्या मागण्या आहे त्या बाबत मा.पालकमंत्री यांनी सुचना आगोदरच दिलेल्या आहे.या योजनेचे राजकारण करायचे व गोंधळात कामकाज होऊ दयायचे नाही ही पध्दत बरोबर नाही.

यावेळी स.सदस्य एकाच वेळी मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.जगदीश सिंध्द :कशासाठी प्रेझेन्टेशन दाखवित आहोत. ते दाखविणे बधंनकारक आहेत का?

मा.महापौर :संबधीत अधिकारी श्री.कोल्हे यांनी सभागृहाला प्रेझेन्टेशननुसार माहिती दयावी.

कार्य.अभियंता (पा.पु) :औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने समांतर जलवाहिनी पीपीपी तत्वावर राबवित आहोत. त्याबाबत माहिती देण्यासाठी प्रेझेंटेशन दाखविण्यात येत आहे. ते खालीलप्रमाणे आहे.

**ठळक बाबी**

- औरंगाबाद शहर दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या संपुर्ण भारतातील एकुण ४५ शहरांपैकी एक शहर झाले आहे.
- हे शहर महाराष्ट्रातील एक महत्वाचे शहर असून मराठवाडा विभागाचे विभागीय मुख्यालय आहे.

- मुंबई, पुणे आणि नागपुर या शहरांनंतर महत्वाचे औद्योगिक शहर असुन मुख्य बाजार पेठेचे ठिकाण व पर्यटन स्थळ म्हणुन औरंगाबाद शहराची ओळख आहे. शहरात असलेल्या शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकिय आणि वाणिज्यीक सेवा सुविधांमुळे हे शहर झपाट्याने वाढत आहे.
- शहरामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांची विभागीय कार्यालये आहेत.
- महाराष्ट्रातील मुख्य शहरांशी रस्त्यांद्वारे शहर जोडलेले असून मुंबई, पुणे, नागपुर व नाशिक या शहरांशी रेल्वेद्वारे आणि मुंबई व दिल्ली, या शहरांना विमान सेवेद्वारे जोडल्या गेले आहे.

**प्रकल्पाचे क्षेत्र**

- दररोज शुध्द आणि पुरेसा पाणी पुरवठा होणे ही प्रत्येक नागरिकाची प्राथमिक गरज आहे.
- या प्रकल्पा अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका हद्दी सह कॅंटोनमेंट बोर्डाचे क्षेत्रही गृहित धरलेले आहे.
- या अंतर्गत १३९ चौ. किलोमीटरचे क्षेत्र गृहित धरलेले आहे.
- सातत्याने वाढ होणारे क्षेत्र असून या अंतर्गत आय.टी. पार्क, सेझ, मल्टीप्लेक्स, विविध शाळा व महाविद्यालये तसेच विविध मॉल्स समाविष्ट आहेत.

**सद्यस्थितीत पाणी पुरवठा**

- सद्यस्थितीत उपलब्ध होणारे पाणी शहराला कमी पडत आहे.
- शहराला नक्षत्रवाडी स्थित संतुलीत जलकुंभाद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पंपींग द्वारे होतो.
- नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभा पासून गुरुत्व वाहिन्यांद्वारे औरंगाबाद शहर व एक्स्प्रेस जलवाहिनीद्वारे सिडको भागास पाणी पुरवठा होतो. वितरण प्रणालीत विविध व्यासांच्या जलवाहिया असून त्याद्वारे पाणी पुरवठा होतो.

**दृष्टीक्षेपात पाणी पुरवठा व्यवस्था**

| | |
|---|---|
| • उद्भव | जायकवाडी धरण |
| • सन २०११ च्या जनगणनेनुसार | लोकसंख्या ११.७३ लक्ष |
| o पाणी पुरवठा सद्यस्थिती | |
| o उद्भवा जवळ उचल | १५६ द.ल.ली. (ढोबळ) |
| • ग्राहकाला मिळणारे परिमाण | १२३ द.ल.ली. (निव्वळ) |
| • प्रत्यक्षात सद्यस्थित दरडोई पाणी पुरवठा | ८० ते १०० लि. प्रति माणसी प्रति दिवस |
| • मंजुर पाणी आरक्षण | ११३.२८ दलघमी<br>(३१० द.ल.ली.) |

**दृष्टीक्षेपात व्यवस्थापन**

| | |
|---|---|
| • प्रस्तावीत संकल्पीत लोकसंख्या (वर्ष २०४१) | २४,४९,४९३ |
| • शेवटच्या ग्राहका पर्यंत मिळणारा पाणी पुरवठा दर | १३५ लि. प्रति माणसी प्रति दिवस |

- उद्भवाच्या ठिकाणी ढोबळ मानाने पाणी उचल — १६० लि. प्रति माणसी प्रति दिवस
- धरणामध्ये ढोबळ मानाने आवश्यक पाण्याचे आरक्षण — १४३.०५ द.ल.घ.मी.
- पाटबंधारे विभागाकडे अतिरिक्त पाण्याच्या आरक्षणासाठी नोंदविलेली मागणी — २९.७७ द.ल.घ.मी. (३० द.ल.घ.मी.)

**अस्तित्वातील पाणी पुरवठा**

**सद्य स्थितीत १५६ दलली पाणी घेतो, १४१ जलशुध्द केंद्रात, १३३ दलली संकुलीत जलकुंभात येते, १२३ दलली जलकुंभात पाणी येते.**

- **जुनी योजना**
  - टप्पा -०१: (१९७४-७५) — २८ द.ल.ली
  - टप्पा -०२ (१९८४-८५) — ०२८ द.ल.ली
  
  **ढोरकीन येथे बुस्टर** (१९८४-८५) — **५६ द.ल.ली**
  
  **नक्षत्रवाडी येथे बुस्टर** (१९८४-८५) — **५६ द.ल.ली**
- **नवीन योजना** (१९९०-९१) — **१०० द.ल.ली**
- **<u>अस्तित्वातील शुध्द उद्धरण वाहिनी</u> :**
  - लांबी — १२,१६० मीटर
  - व्यास — ७०० मीमी / १२१९ मीमी
  - पाईप प्रकार — CI आणि MS
- **संतुलीत जलकुंभ**
  - नक्षत्रवाडी येथे क्षमता — १२.३ द.ल.ली (७.५ ML + ४.८ ML)

**भविष्यातील लोकसंख्या व पाण्याची मागणी**

| अ.क्र. | वर्ष | लोकसंख्या | उद्भवाजवळ मागणी (द.ल.ली) | अस्तित्वातील जुन्या (१०० MLD) योजनेतून मिळणारे परिमाण (द.ल.ली) | शेरा (प्रस्तावित योजनेतून) (द.ल.ली) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०११ | ११४८७८९ | १८३.७५ | १०० | ८३.७५ |
| २ | २०२६ | १७१०२१५ | २७३.६४ | ९० | १८३.६४ |
| ३ | २०४१ | २४४९४९३ | ३९१.९४ | ८० | ३११.९४ |

## प्रकल्पाची पार्श्वभुमी

- सदर प्रकल्पाला केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहर पायाभूत सुविधांच्या विकास योजना (UIDSSMT) योजने अंतर्गत मंजुरी प्रदान झालेली असून संपूर्ण प्रकल्प हा केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.
- सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे Department Of Economical Affairs (DEA),महाराष्ट्र शासन, एशिया डेव्हलपमेंट बँक, महाराष्ट्र शासनाचा पीपीपी सेल यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत पारदर्शक रित्या पुर्ण करण्यात आली.

## दृष्टीक्षेपात प्रकल्प

- गळती व्यवस्थापन करणे, तसेच अवैध नळ कोक्शन शोधुन नियमीत करणे, मीटर बसविणे देयके देणे व वसुली सक्षम करुन महसुल न मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करणे.
- वितरण प्रणाली तसेच मुख्य जलवाहिया आवश्यकतेनुसार संकल्पनाद्वारे वाढविणे वा सक्षमीकरण करणे.

## UIDSSMT अंतर्गत मंजुर प्रकल्प

| अ.क्र. | उपांगाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (रुपये लक्ष मध्ये) |
|---|---|---|
| १ | सर्वेक्षण व उद्‌भव | ५६९.५७ |
| २ | अशुध्द जल पंपींग मशिनरी | ५८५.५२ |
| ३ | अशुध्द जल उदधरणवाहिनी | १४६५७.३१ |
| ४ | जलशुध्दीकरण केंद्र (क्षमता - १९० द.ल.ली.) | ११६७.१० |
| ५ | शुध्द जल पंपीग मशिनरी | ७४१.३१ |
| ६ | शुध्द जल उद्धरण वाहिनी | ७६१०.४९ |
| ७ | शुध्द जल गुरुत्ववाहिनी | ३०५८.१८ |
| ८ | वितरण प्रणाली | ७५८४.१० |
| | **एकुण किमत** | **३५९.६७ कोटी** |

## पीपीपी प्रकल्पाची किंमत

| अ.क्र. | उपांगाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (रुपये लक्ष मध्ये |
|---|---|---|
| १ | सर्वेक्षण | १८.५७ |
| २ | कॉफर डॅम | १८९.६० |
| ३ | जोड कालवा | ४१.८८ |
| ४ | जॅकवेल व पंपगृह (३६ मी. X १५ मी.) | ४३७.८० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जोड पुल (३६० मी. लांब, ९ मी. रुंदी) | २२१.०६ |
| ६ | अशुध्द जल पंपींग मशिनरी (६ नग ५५० KW) | ८६८.५६ |
| ७ | अशुध्द जल उदधरणवाहिनी<br>(२००० मी. मी. व्यास. १६ मी. मी. जाडी,<br>लांबी २७००० मी.) | १९,३६४.४० |
| ८ | जलशुध्दीकरण केंद्र (क्षमता - १९२ द.ल.ली.)<br>व पुर्नवापर संप (क्षमता - ६ द.ल.ली) | १,४६१.१४ |
| ९ | शुध्द जल पंपींग मशिनरी (६ नग. ९५०KW) | १,२५०.२२ |
| १० | शुध्द जल उदधरण वाहिनी<br>(२००० मी. मी. व्यास. २० मी. मी. जाडी, लांबी=१२१६० मी.) | १०,३३८.०५ |
| ११ | नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभ (१० द.ल.ली क्षमता) | २७९.२८ |
| १२ | कर्मचारी निवासस्थाने / अनुषंगिक कामे | १५१.४१ |
| | **एकुण रु. लक्षमध्ये (१ ते १२)** | **(Bulk) ३४,६२१.९६** |
| १३ | मुख्य व वहन जलवाहिन्या (D.I. & M.S. पाईप) | ६,९१७.०० |
| १४ | DI पाईप वितरण प्रणाली (१२९० कि.मी) आणि जलकुंभ (एकुण ११) | ३२,०१८.०० |
| १५ | मीटर बसविणे | ५,६६३.०० |
| | **एकुण रु. लक्षमध्ये (१३ ते १५)** | **(Distribution) ४४,५९८.००** |
| | **एकुण किमत** (लक्षमध्ये) | **७९२,१९.९६** |

**प्रकल्पाची किंमत व अनुदान**

| **रुपये कोटीत** | **ठोक** | **वितरण** | **मुख्य वाहिन्या** | **जलमापक यंत्र** | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|
| प्रकल्पाची अंदाजपत्रकीय किंमत | ३४६.२२ | ३२०.१८ | ६९.१७ | ५६.६३ | ७९२.२० |
| अनुदान | २६५.८२ | १३३.६९ | ----- | ----- | ३९९.५१ |
| UIDSSMT | २०२.५९ | ८५.१४ | ----- | ----- | २८७.७४ |
| महाराष्ट्र शासन मुळ योजनुसार | २५.३२ | १०.६४ | ----- | ----- | ३५.९७ |
| महाराष्ट्र शासन पुरक | ३७.९१ | ३७.९१ | ----- | ----- | ७५.८२ |
| विकासकाचा सहभाग | ८०.३९ | १८६.४९ | ६९.१७ | ५६.६३ | ३९२.६८ |

साधारणतः एकुण किंमतीच्या ५०% सहभाग विकासकाचा राहणार आहे.

## योजनेचा कार्यकाळ (Time line)

- **कन्सेशन कालावधी - २० वर्ष**
  (नियुक्तीच्या तारखे पासून)
- **तयारीसाठी कालावधी**
  (कन्सेशन ॲग्रीमेंट केल्यापासून ते नियुक्तीच्या तारखेपर्यंत)
  **बांधकाम आणि पुनर्वसन कालावधी - ३ वर्ष**
  (नियुक्तीची तारीख ते व्यावसायीक संचलन तारखेपर्यंत)
  **संचलन व देखभाल दुरुस्ती कालावधी - १७ वर्ष**
  (व्यावसायीक संचलन तारीख ते कन्सेशन कालावधीच्या शेवटच्या दिवसा पर्यंत)

## महानगरपालिकेला उघडलेली स्वतंत्र बँक खाती

**निविदेच्या अटी व शर्तीनुसार**

- Collection Account
- Water Payment Account
- Water Payment Reserve Account
- Independent Engineer & Independent Auditor

यांच्या वार्षीक देयकांची रक्कम इ. जमा करण्यासाठी वेगवेगळी स्वतंत्र बँक खाती Appointed date च्या वेळी महानगरपालिकेला उघडावी लागणार आहेत.

### Collection Account,

या स्वतंत्र खात्यात विकासकाने ग्राहकांकडून जमा केलेली पाणीपट्टीची रक्कम (User Charges) भरणा केली जाईल. या भरणा केलेल्या रकमेतुन योजनेचे विद्युत देयक, पाटबंधारे खात्याला द्यावयाचे पाणी खरेदीचे देयक व प्रतिनियुक्ती वर असलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते इ. तसेच पाणीपट्टी पोटी मिळणारी फरकाची रक्कम प्रत्येक महिन्याला कपात केली जाईल व उर्वरीत रक्कम विकासकाला देण्यासाठी Water Payment Account मध्ये दरमहा Transfer केली जाईल.

### Water Payment Account

या खात्यामध्ये विकासकाला महानगरपालिकेने द्यावयाची AOSG ची रक्कम प्रत्येक तिन महीन्याला (Quarterly) जमा करावयाची आहे. निविदा अटी व शर्तीनुसार ७५% Fixed Payment तिमाहीच्या (Quarter च्या) सुरुवातीला व २५% Variable Payment तिमाहीच्या शेवटी विकासकाला द्यावयाचे आहे. विकासकाला द्यावयाचे २५% Variable Payment हे विकासक देणार असलेल्या सेवा व सुविधांचा स्तर (Service Level Parameters) विचारात घेऊन द्यावयाचे आहे.

### Water Payment Reserve Account

निविदा अटी व शर्तीनुसार विकासकास, महानगरपालिकेकडुन Payment Security मिळावी या करीता हे बँक खाते महानगरपालिकेस उघडावे लागणार आहे. या खात्यामध्ये (१.५ x AOSG) एवढी रक्कम नेहमी करीता Deposit ठेवणे

महानगरपालिकेस बंधनकारक राहणार आहे. यासाठी महानगरपालिकेस नियुक्तीच्या तारखेला पहिल्या वर्षाकरीता रुपये ९४.५० कोटी या खात्यामध्ये जमा करावयाचे आहे.

## Independent Engineer and Independent Auditor यांच्या वार्षीक देयकांची रक्कम जमा करणेसाठी बँक खाते

निविदा अटी व शर्तीनुसार Independent Engineer करीता बांधकाम कालावधी मध्ये २.३५% of Project Cost + Service Tax आणि संचलन /देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये ०.२५% of Project Cost + Service Tax तसेच Independent Auditor करीता संपुर्ण Concession Period मध्ये ०.१०% of Project Cost + Service Tax याप्रमाणे वार्षिक देयके द्यावी लागणार आहेत. या देय रकमांच्या ५०% रक्कम महानगरपालिकेने व उर्वरीत ५०% रक्कम विकासकाने Independent Engineer आणि Independent Auditor यांना द्यावयाची असून प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला सदर रक्कम महानगरपालिका आणि विकासक यांनी स्वतंत्र संयुक्त बँक खात्यामध्ये जमा करावयाची आहे.

## Project Milestones and Project Grant

योजनेची अंदाजपत्रकीय किंमत रु.७९२.२० कोटी एवढी असून त्यापैकी Project Grant म्हणून एकुण शासन अनुदान रु. ३९९.५३ कोटी विकासकास तीन वर्षाच्या बांधकाम कालावधीत १२ Quarterly Milestones मध्ये द्यायचे आहेत. विकासकाला Equity (स्वत:च्या सहभागाची रक्कम) and Debt (कर्ज) च्या स्वरुपात रुपये ३९२.६८ कोटी रक्कम प्रकल्प उभारणीसाठी टाकावयाची आहे. सदर रक्कम विकासक एकुण १२ Quarterly Milestones मध्ये टाकणार आहे.

या १२ Milestones बद्दलची म्हणजेच प्रत्येक Mile Stone मध्ये विकासक स्वत:ची किती रक्कम टाकेल व त्यात त्यास अपेक्षीत Project Grant किती असेल याची सविस्तर माहिती विकासक Preparatory Period दरम्यान महानगरपालिकेस सादर करणार आहे. बांधकाम कालावधीमध्ये द्यावयाची Project Grant ची रक्कम Annual Operational Support Grant च्या व्यतीरिक्त असेल. Project Grant देतांना प्रत्येक वेळी या रकमेच्या ५% रक्कम Contingency Reserve म्हणुन महानगरपालिकेतर्फे कपात केली जाणार आहे. सदरची रक्कम बांधकाम कालावधी पूर्ण झाल्यानंतर (योजना कार्यान्वीत झाल्यानंतर) चार तीमाही (Quarter) मध्ये समान हप्त्यात महानगरपालिकेने विकासकास परत द्यावयाची आहे.

महानगरपालिका Appointed Date च्या वेळी विकासकाला पहिल्या माईलस्टोनची Project Grant आगाऊ (Advance) स्वरुपात देईल. विकासक त्याचा Equity and Debt चा हिस्सा त्यामध्ये टाकेल. पहिल्या माईलस्टोनचे कमीत कमी ८५% काम पुर्ण झाल्यानंतर विकासक दुसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant ची मागणी करु शकेल. पहिल्या माईलस्टोन अंतर्गत केलेले काम Independent Engineer तपासुन प्रमाणीत करेल. त्यानंतरच दुसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant देय राहील. समजा जर पहिल्या माईलस्टोनचे काम ९०% पूर्ण झाले असेल तर दुसऱ्या माईलस्टोनसाठी ९०% Project Grant आगाऊ स्वरुपात देय राहील.

दुसऱ्या माईलस्टोनचे कमीत कमी ८५% काम पूर्ण झाल्यानंतर व पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पूर्ण झाल्यानंतरच विकासक तिसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant ची मागणी करु शकतो. पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पुर्ण झाले नसेल तर कोणत्याही परिस्थितीत

तिसऱ्या माईलस्टोन करीता Project Grant देय होणार नाही. दुसऱ्या माईलस्टोनचे किमान ८५% काम पुर्ण व पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पुर्ण झाले तरच तीसऱ्या माईलस्टोन करीता आधिच्या माईलस्टोनचे राहीलेले १०%+८५% of Third Milstone एवढी रक्कम Project Grant म्हणुन देय राहील. या पध्दती प्रमाणे पुढील प्रत्येक माईलस्टोनसाठी Project Grant देय राहील. ही कार्यवाही कशा प्रकारे करावयाची आहे या संबंधीची तरतुद Concession Agreement मध्ये करण्यात आलेली आहे.

**बांधकाम कालावधी - दंडात्मक कार्यवाही**

तीन वर्षाच्या बांधकाम कालावधीमध्ये विकासकाला १२ Milestone मध्ये प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण करावयाचे आहे. जर निविदा अटी व शर्तीनुसार एखाद्या Milestone अंतर्गत नमुद कामे पुर्ण झाली नाहीत तर महानगरपालिका विकासकाला अशी कामे पुर्ण करण्याकरीता ९० दिवसाचा कालावधी देईल. जर या ९० दिवसाच्या कालावधी मध्ये विकासक काम पुर्ण करण्यास असमर्थ ठरला तर महानगरपालिका सुरक्षा रक्कमेच्या १% इतकी रक्कम किंवा त्याचा भाग दर आठवड्याला दंड म्हणुन कपात करेल. अशा कारणांमुळे जर विकासक तिन वर्षामध्ये बांधकाम पुर्ण करुन नविन योजना कार्यान्वीत करु शकला नाही तर महानगरपालिका सुरक्षा रकमेतन १% किंवा त्याचा भाग प्रति आठवडा यानुसार जास्तीत जास्त १०% पर्यंत रक्कम कपात करेल.

पाणीपट्टीच्या देयकांचे संगणकीकरण आणि वसुलीची कार्यक्षम यंत्रणा उभारणेचा समावेश आहे. Appointed Date च्या आधीची थकीत पाणीपट्टीची रक्कम (Arrears) निविदा अटी व शर्तीनुसार विकासकाला Incentive देऊन विकासका मार्फत वसुली करुन घेण्यात येणार आहे. सदर Incentive देण्याबाबतची कार्यपद्धती खालील प्रमाणे आहे.

- थकबाकी वसुली ०-५०% झाल्यास प्रोत्साहा रक्कम १५%
- थकबाकी वसुली ५०-७५% झाल्यास प्रोत्साहा रक्कम २०%

थकबाकी वसुली ७५% व त्यापेक्षा जास्त झाल्यास प्रोत्साहा रक्कम ३०% विद्युत देयकामध्ये दरवर्षी १०% वाढ व पाटबंधारे खात्याला द्यावयाच्या पाणी खरेदी देयकामध्ये दरवर्षी १५% वाढ होईल असे निविदेमध्ये गृहीत धरलेले आहे. ही वाढीव रक्कम विकासकानेच भरणे बंधाकारक आहे. जर या पेक्षा अधिक दर (१०% आणि १५% पेक्षा जास्त) वाढल्यास त्यावरील फरकाची रक्कम महानगरपालिकेला भरावी लागणार आहे.

- जर शासनाकडुन मिळणारे प्रकल्पाचे अनुदान उशीरा प्राप्त झाले व Project Milestone नुसार Project Grant देण्यास महानगरपालिकेस उशीर झाला तर अशा परिस्थितीमध्ये विकासक प्रकल्पासाठी स्वत: रक्कम उभारेल व प्रकल्पाच्या कामांमध्ये खंड पडणार नाही याची दक्षता घेईल. विकासकाने उभारलेल्या अशा रकमेसाठी विकासकास १५% व्याज देणे महानगरपालिकेला बंधाकारक राहील.
- एखाद्या परिस्थितीमध्ये शासनाकडुन पुढील अनुदान मिळाले नाही तर अशी रक्कम विकासक स्वत: उभारेल. अशा रक्कमेची परतफेड करण्यासाठी महानगरपालिका विकासकाला प्रत्यक्ष रक्कम देईल किंवा पाणीपट्टीचे दर वाढवुन देईल किंवा Concession Period वाढवुन देईल. मात्र वाढीव Concession Period हा जास्तीत जास्त दहा वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

- या निविदे मध्ये समाविष्ट असलेल्या कामांव्यतीरीक्त Additional Work करणे आवश्यक असेल तर महानगरपालिकेच्या मान्यतेने विकासक Change in Scope नुसार असे काम करु शकतो. अशा कामांसाठी येणारा खर्च निविदा अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेने त्या त्या वर्षीच्या दरसुची नुसार / बाजार भावानुसार (ज्या बाबी दरसुची मध्ये समाविष्ट नसतील त्या बाबींसाठी) विकासकाला देणे बंधाकारक आहे.
- Concession कालावधीमध्ये नागरिकांकडुन जमा केली जाणारी पाणीपट्टीची संपूर्ण रक्कम व Annual Operational Support Grant या दोही बाबी २० वर्षाच्या Concession कालावधीमध्ये विकासकास देय आहेत. विकासक बांधकाम कालावधीमध्ये शहरातील अस्तित्वातील सर्व ग्राहकांच्या नळजोडण्या Medium Density Poly Ethelene (MDPE) पाईपने बदलणार आहे आणि नविन जोडण्या देणार आहे तसेच प्रत्येक नळजोडणीला स्वतंत्र जलमापक यंत्र (Consumer Meter) बसविणार आहे. योजना कार्यावीत झाल्या नंतर सदरचा खर्च विकासक ग्राहकांकडुन पुढील पाच वर्षांमध्ये समान हप्त्यात वसुल करणार आहे.
- नळ जोडणीचा खर्च (अर्धा इंच कनेक्शनासाठी) - रुपये १४२०/-
- मिटरचा खर्च (अर्धा इंच कनेक्शनासाठी) - रुपये ३६२०/- पाच हफ्त्यात ग्राहकाकडुन वसुल करणार आहोत.

**एकुण खर्च -रुपये ५०४०/-**

पी.पी.पी. औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७९२.२० कोटी एवढी आहे. मुळ DPR मध्ये वितरण व्यवस्थे करीता DI पाईपची मायता असल्याने पी.पी.पी. योजने अंतर्गत DI पाईप गृहीत धरुन अंदाजपत्रक केलेले आहे. सध्या आधुनीक तंत्रज्ञानाने विकसीत High Density Poly Ethelene (HDPE) पाईपचा वापर इतर शहरांमध्ये पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेकरीता सुरु झालेला आहे. या संदर्भाने मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवा प्राधिकरण यांनी परिपत्रक क्र. १३० दिनांक ०९.०३.२००९ अन्वये सुचना दिलेल्या आहेत. या पाईपच्या वापरामुळे गळत्यांचे प्रमाण लक्षणिय रित्या कमी होऊ शकते. निविदा अटी व शर्ती नुसार वितरण व्यवस्थेमध्ये DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI Pipe वापरण्यास 'केंद्र व राज्य शासनाकडुन आवश्यक ती मान्यता प्राप्त करणे, अशा बदलामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भार सोसावा न लागणे, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असणे आणि शासनाने अशा बदलास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरणे' अशा अटींवर विकासकास मुभा देण्यात आलेली आहे.

समांतर पाणी पुरवठा योजनेची कामे लवकरच सुरु होणार असल्याने या पुढे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठयाची कोणतीही कामे प्रस्तावीत करता येणार नाहीत तसेच ज्या कामांचे कार्यादेश अद्याप झालेले नाहीत अशी कामे रद्द करणे आवश्यक आहे. जेणे करुन महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल. सहा महिन्याच्या तयारी कालावधी नंतर म्हणजेच नियुक्तीच्या तारखेला सुजल निर्मल अभियनां अंतर्गत असलेले काम व जायकवाडी येथील आपत्कालीन पाणी पुरवठा योजनेचे काम ही दोन्ही कामे वगळता

उर्वरित सर्व कामांचे करारनामे रद्द करण्यात येतील. नियुक्ती तारखेनंतर विकासक योजनेचा ताबा घेऊन पाणीपुरवठ्याशी संबंधीत आवश्यक ती सर्व कामे करणार आहे.

## स्वतंत्र अभियंता

Concession कालावधी करीता नेमणुक करण्यात येईल

- महानगरपालिका व विकासक संयुक्त रित्या ठरवुन नेमणुक करेल
- महानगरपालिका व विकासक सारख्या प्रमाणात स्वतंत्र अभियंत्याचा खर्च अदा करेल.
- **पुर्नविलोकन व मान्यता**
  - विकासकाने तयार केलेले प्रकल्पाचे संकल्पा व नकाशे तपासणे
  - प्रकल्प राबविण्याबाबत त्रैमासिक माईलस्टोन एकुण १२, तसेच काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र इ. कार्यवाही
  - बदललेल्या कार्यव्याप्तीच्या अंमलबजावणीसाठी किंमत व वेळेचे अंदाजपत्रक
  - योजनेच्या कार्यान्वयन कालावधीत कामावर देखरेख करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे, झालेल्या कामाचे मुल्यांकन करणे व गुणवत्ता नियंत्रण करणे.
- प्रकल्पाचे त्रैमासिक पाहणी (Review)
- प्रकल्पाशी संबंधीत योग्य सुधारणांबाबत (Reforms) मार्गदशन

कन्सेशन कालावधी संपण्यापुर्वी प्रकल्प सुविधांचे उर्वरीत आयुष्य किती राहीले ते ठरवणे.

## पात्र निविदाधारकांची यादी

| Sr. No | Lead Consortium Member | Consortium Member | Consortium Member |
|---|---|---|---|
| 1 | CASCAL NV | EA Infrastructure Private Limited | Nagarjuna Construction Company Limited |
| 2 | Jindal Water Infrastructure Limited | Hindustan Construction Company | Manila Water Company |
| 3 | JMC Projects India Limited | Metito Berlinwasser Limited | SREI Infrastructure Finance Limited |
| 4 | IL&FS Water Limited | Puncak Niaga | |
| 5 | Mahindra Lifespace Developers Limited | Suez Environment | |
| 6 | Ranhill Utilities | Jamshedpur Utilities and Services Company Limited | |
| 7 | Subhash Projects Marketing Ltd | National Water & Sewerage Corporation | Va Tech Wabag Ltd. |
| 8 | United Phosphorus Limited | Pratibha Industries Limited | Salcon Engineering Berhad |
| 9 | VEOLIA Water India | | |

**वर्ष १ ते ३ या कसेशन कालावधी खालील दराने पाणीपट्टीची रक्कम विकासकाला दिली जाईल**

| पाईप व्यास, इंच (मिमी) | घरगुती महसुल, रु./कनेक्शन/ वर्ष | बिगरघरगुती महसुल, रु./ कनेक्शन/ वर्ष |
|---|---|---|
| १ / २ (१५) | १,८०० | ६,५०० |
| ३ / ४ (२०) | २,९२५ | १२,००० |
| १ (२५) | ६,८२५ | २५,००० |
| १.५ (४०) | ३०,००० | ७०,००० |
| २ (५०) | ५०,००० | १,४०,००० |
| ३ (८०) | ८०,००० | २,००,००० |
| ४ (१००) | १,२०,००० | ३,००,००० |
| ६ (१५०) | २,००,००० | ४,००,००० |
| ८ (२००) | ३,००,००० | |
| Volumetric | रुपये ८ प्रति किलो लिटर ( तात्पुरते बांधकामासाठी रुपये ३९ प्रति किलो लिटर) | रुपये ३९ प्रति किलो लिटर |

**वर्ष ४ ते २० या कन्सेशन कालावधी खालील दराने पाणीपट्टीची रक्कम विकासकाला दिली जाईल (व्हॅल्युमेट्रीक पद्धतीने )**

| दर, रु.प्रति किलो लिटर | वर्ष ४ - ६ | वर्ष ७ - ९ | वर्ष १० - १२ | वर्ष १३ - १५ | वर्ष १६ - १८ | वर्ष १९ - २० |
|---|---|---|---|---|---|---|
| घरगुती वापर किलो लिटर / महिना / कनेकशन | | | | | | |
| ० - ८ | रु. ९ | रु.११ | रु.१४ | रु.१७ | रु.२१ | रु.२६ |
| ८ - १७ | रु. १५ | रु.१८ | रु.२२ | रु.२७ | रु.३३ | रु.४० |
| १७ - २३ | रु.२३ | रु.२८ | रु.३४ | रु.४१ | रु.५० | रु.६० |
| २३ नंतर | रु.३० | रु.३६ | रु.४४ | रु.५३ | रु.६६ | रु.७७ |
| बिगर घरगुती ग्राहक | रु.४४ | रु.५३ | रु.६४ | रु.७७ | रु.९३ | रु.११२ |

## Request For Proposal (RFP) टप्पा

- निविदा पुर्व बैठक - प्रथम - ३ जुन २०१०
  - द्वितिय - १३ ते १६ जुलै २०१०
  - तृतिय - १६ नोव्हेंबर २०१०
- निविदा दाखल करावयाची दिनांक - ३०.११.२०१०
- प्राप्त निविदा - दोन

- तांत्रिक निविदा उघडल्याची दिनांक - १ डिसेंबर २०१०
- तांत्रिक निविदेचे सादरीकरण - १४ डिसेंबर २०१०
- आर्थिक निविदा उघडल्याची दिनांक - १४ डिसेंबर २०१०
- निविदाधारकाने मागीतलेली AOSG ची रक्कम
- सुभाष प्रोजेक्ट मार्केटींग लि. (SPML) रुपये ६३ कोटी पहिल्या वर्षाकरीता
- आय.एल. & एफ .एस. वॉटर लि. रुपये ११२.९० कोटी पहिल्या वर्षाकरीता

## सेवा स्तर गरजा

- विकासकाने पुरवायच्या सेवा स्तर गरजांची खालील दोन वर्गवारीमध्ये विभागणी केलेली आहे.
- **भाग अ - पूर्व COD सेवा स्तर गरजा:-** या सेवा स्तर गरजा प्रकल्पाचे बांधकाम व पुर्नवसन कालावधी करीता म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष १ ते ३ करीता लागु राहतील.
- **भाग ब - COD नंतरच्या सेवा स्तर गरजा:-** या सेवा स्तर गरजा प्रकल्पाचे संचलन व देखभाल दुरुस्ती कालावधी करीता म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष ४ ते २० करीता लागु राहतील.

## सेवा स्तर गरजा

- औरंगाबाद महानगरपालिका Annual Operational Support Payment समान चार हप्त्यात (प्रति तिमाही ) अदा करेल. प्रत्येक हप्ता हा Annual Operational Support Payment च्या २५% इतका असेल.

  **अ) निश्चित देयक (Fixed Payment):-** हे एकुण तिमाही Operational Support Payment च्या ७५% इतके असून प्रत्येक तिमाही च्या सुरुवातीस देण्यात येईल. हे देयक कुठल्याही सेवा स्तर गरजांशी निगडीत नाही.

  **ब) अनिश्चित देयक (Variable Payment):-** हे एकुण तिमाही Operational Support Payment च्या २५% इतके असून प्रत्येक तिमाही च्या शेवटी देण्यात येईल. हे देयक विकासकाने पुरवावयाच्या सेवा स्तर गरजांशी निगडीत राहील.

**सेवा स्तर गरजा (Service Level Parameters)**
**During Construction Period**

| अ.क्र. | मानक | वर्ष १ | वर्ष २ | वर्ष ३ |
|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा | कमीत कमी १३५ प्रति दिन प्रति व्यक्ती लि. | कमीत कमी १३५ प्रति दिन प्रति व्यक्ती लि. | कमीत कमी १३५ प्रति दिन प्रति व्यक्ती लि. |
| २ | घाऊक पाण्याच्या मोजमापा करीता मीटर्स बसविणे. | स्वतंत्र अभियंता व विकासक यांच्या समन्वयाने १००% ठिकाणी बसविणे | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | वितरण व्यवस्थे अंतर्गत घाऊक मीटर्स बसविणे | स्वतंत्र अभियंता व विकासक यांच्या समन्वयाने १००% ठिकाणी बसविणे | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती |

## निविदे नुसार पुर्व तयारी कालावधीत (Preparatory Period ) विकासकाने साध्य करावयाची उद्दीष्टे

१. विकासकाने प्रकल्प राबविण्या करीता आवश्यक ते सर्व परवाने स्वखर्चाने उपलब्ध करावेत.
२. Performance Security १० % of Project Cost i.e रु. ७९.२ कोटी जमा केली आहे.
३. प्रकल्प राबविण्यासाठी लागणारा निधी, विकासकाला स्वत: टाकावयाची रक्कम (Equity) आणि कर्जे उपलब्ध करण्याबाबत महानगरपालिकेस हमी देईल. जसे की, कर्जाचा कररनामा किंवा कर्ज देणाऱ्याचे पत्र.- कर्जाचा करारनामा सादर केला आहे.
४. स्वतंत्र अभियंता व स्वतंत्र लेखा परिक्षकाची पहिल्या वर्षाच्या फीची ५०% रक्कम विकासक राष्ट्रीय बँकेमध्ये खात्यावर जमा करेल. - प्रत्येक तीमाही कालावधीसाठी रक्कम जमा करण्यात येत आहे.
५. विकासक प्रकल्पाचा विमा उपलब्ध करेल.
६. वॉटर पेमेंट रिजर्व अकाऊंटच्या करारासह प्रकल्पाचे इतर सर्व करारनामे विकासक अंतिम करेल. - करारनामे करण्यात आले आहेत.

## निविदे नुसार पुर्व तयारी कालावधीत (Preparatory Period ) महानगरपालिकेने साध्य करावयाचे उद्दीष्ट

१. वॉटर पेमेंट रिजर्व अकाऊंट करारनामा करणे - कार्यवाही पूर्ण
२. स्वतंत्र लेखा परिक्षक यांची नेमणूक करणे - कार्यवाही अंतर्गत
३. स्वतंत्र अभियंता व स्वतंत्र लेखा परिक्षकाची पहिल्या वर्षाच्या फीची ५०% रक्कम महानगरपालिका राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खात्यावर जमा करेल - प्रत्येक तीमाही कालावधीसाठी रक्कम जमा करण्यात येत आहे.
४. निविदेनुसार भाग (A) मधील प्रकल्पाची जागा विकासकाला हस्तांतरीत करुन ताब्यात देणे जागा ताब्यात दिल्या आहेत.
५. विकासकाकडे प्रतिनियुक्तीवर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया राबविणे - २६९ कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविले आहे.
६. आपतकालीन पाणी पुरवठा योजना व सुजल निर्मल अभियान अंतर्गत सुरु असलेल्या योजना वगळता पाणी पुरवठ्याशी संबंधीत अस्तित्वातील इतर सर्व कामांचे करारनामे संपुष्टात आणणे - Appointed Date रोजी सर्व कामे रद्द करण्यात आली आहेत.
७. महाराष्ट्र शासााकडून पीपीपी योजनेस मान्यता घेणे - मान्यता प्राप्त
८. पाणी पुरवठा उपविधी अंतिम करणे - शासन मान्यता प्राप्त आहे.

९. कलेक्शन अकाऊंट व वॉटर पेमेंट रिजर्व अकाऊंट राष्ट्रीयकृत बँकेत उघडुन त्यामध्ये AOSG च्या १.५ पट म्हणजेच रुपये ९४.५० कोटी एवढी रक्कम जमा करणे - रक्कम जमा केली आहे.

## टर्मिनेशन पेमेंट

१. जर विकासकाच्या चुकीमुळे कॉट्रॅक्ट टर्मिनेट केला तर महानगरपालिका विकासकाकडून शिल्लक कर्जाची रक्कम वजा विमा रक्कम एवढी रक्कम टर्मिनेशन पेमेंट म्हणून वसुल करेल.

- अशा परिस्थितीमध्ये विकासकाच्या जमा असलेल्या सुरक्षा रकमे मधुन रक्कम काढण्याची मुभा महानगरपालिकेला असेल.

२. जर महानगरपालिकेच्या चुकीमुळे कॉन्ट्रॅक्ट टर्मिनेट करावा लागला तर विकासक टर्मिनेशन पेमेंट म्हणून खालीलप्रमाणे रक्कम महानगरपालिकेकडुन वसुल करेल.

- शिल्लक कर्जाची रक्कम वजा विमा रक्कम
- विकासकाने टाकलेली स्वत:ची सहभागाची रक्कम (Equity)
- प्रकल्पावरील कर्मचाऱ्यांना त्यांची नोकरी गमावल्या बद्दल नुकसान भरपाई पोटी द्यावयाची योग्य रक्कम (Cl. ३४.४ )

## तयारी कालावधीच्या अंतिम टप्प्यात (Appointed Date ) करावयाची अपेक्षित कार्यवाही

१. तयारी कालावधीच्या अंतिम टप्प्यात विकासक आणि महानगरपालिका अस्तीत्वातील पाणी पुरवठा मालमत्तेचे अवलोकन करुन Asset रजिस्टर तयार करेल. नियुक्तीच्या तारखेला ही मालमत्तेची (चल / अचल) यादी करारनाम्याचा भाग धरल्या जाईल. तद्नंतर सुधारीत व विकासक वेळोवेळी आणि गरजे नुसार हे रजिस्टर कन्सेशन कालावधी पर्यंत नियमीत (Up Date ) करेल - कार्यवाही पूर्ण.

२. तयारी कालावधीच्या अंतिम टप्प्यात महानगरपालिका निविदेच्या 'ब' भागातील भुसंपादनाचे परिशिष्ट तयार करुन विकासकाला हस्तांतरीत करेल. नियुक्तीच्या तारखेला सदर परिशिष्ट करारनाम्याचा भाग राहील - कार्यवाही पूर्ण.

३. तयारी कालावधीच्या अंतिम टप्प्यात महानगरपालिका पाणीपट्टी न भरणाऱ्या थकबाकी दारांची माहिती थकबाकीच्या रकमेसह विकासकाला देईल. जी की नियुक्तीच्या तारखेला करारनाम्याचा भाग राहील - कार्यवाही अंतर्गत आहे.

४. तयारी कालावधीच्या अंतिम टप्प्यात महानगरपालिका विकासकाला अशुध्द पाण्याची विशेषता जी की सर्वसाधारण शुध्दीकरणासाठी स्विकृत असेल त्याचे मापदंड देईल. ही बाब नियुक्तीच्या तारखेला करारनाम्याचा भाग राहील - कार्यवाही पूर्ण.

## या प्रकल्पा अंतर्गत करावयाची कामे

- जायकवाडी येथे हेडवर्क्स व पंपगृह बांधणे.
- २००० मि.मी.व्यासाची अशुध्द जल पोलादी उध्दरण वाहिनी टाकणे.-लांबी २७ कि.मी.
- फारोळा येथे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे.- क्षमता १९२ द.ल.ली.
- २००० मि.मी.व्यासाची शुध्द जल पोलादी उध्दरण वाहिनी टाकणे.-लांबी १२.१२ कि.मी.

- १० द.ल.ली. क्षमतेचा नक्षत्रवाडी येथे संतुलीत जलकुंभ बांधणे.
- शहरांतर्गत विविध व्यासाच्या मुख्य जलवाहिन्या टाकणे.
- शहरांतर्गत १०० ते ७०० मि.मी. व्यासाच्या वितरणीका टाकणे.-लांबी १२८९ कि.मी.
- वितरण प्रणाली अंतर्गत विविध ठिकाणी १७ जलकुंभ बांधणे.
- हर्सूल पाणी पुरवठा योजनेचे नुतनीकरण करणे.
- पाणी पुरवठा योजनेच्या विविध पुरवठा स्तरावर जलमापक यंत्र बसविणे तसेच वितरण व्यवस्थे अंतर्गत म.डी.पी.ई. पाईपने जुन्या नळ जोडण्या बदलणे/नविन नळ जोडण्या देणे व प्रत्येक जोडणीस जलमापक यंत्र बसविणे.
- नागरिकांच्या तक्रार निवारण करण्यासाठी तक्रार निवारण कक्ष उभारणे.
- प्रत्येक नळ जोडणीचे संगणकीय मासीक देयक देणे व देयकाची वसुली करणे.

**या योजनेमुळे नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा व फायदे**

- आज शहरास दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येतो. कन्सेशन कालावधीच्या दुसऱ्या वर्षापासुन दररोज पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.
- बांधकाम कालावधी पुर्ण होऊन नविन योजना कार्यान्वीत झाल्यानंतर म्हणजेच कन्सेशन कालावधीच्या पाचव्या वर्षापासुन २४x७ पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.
- संपुर्ण शहराचे Hydraulic Modeling करुन वितरण वाहिन्या टाकण्यात येणार असल्याने साधारणतः किमान सात मीटर उंची पर्यंत पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.
- सद्यस्थितीत सर्वच नळधारकांना समानदराने पाणी पट्टीची आकारणी करण्यात येते. या योजनेत सर्व नळ जोडण्यांना जलमापक यंत्र बसविण्यात येणार असल्याने प्रत्यक्ष पाणी वापरानुसार पाणी पट्टीची आकारणी करण्यात येणार आहे. यामुळे कमी पाणी वापर करणाऱ्या नळधारकांना सध्या असलेल्या पाणीपट्टी रक्कमेपेक्षाही कमी रक्कम लागणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांना आर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही. ज्या भागात पाणी येणार नाही किंवा कमी येईल. अशा वेळी कंपनी टँकर द्वारे पाणी पुरवठा करेल. टँकर कंपनीकडे हस्तांतर करण्यात आले आहे. ज्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो तेथे सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले दर संदर्भात ठराव केला त्यानुसार आकारणी केली जाते.

श्री.प्रमोद राठोड :प्रतिदिन प्रति व्यक्ती १३५ लि.पाणी मिळणार का?

श्री.मुजीब खान : प्रेझेन्टेशन करीत आहे त्याची प्रत सर्व सदस्यांना दिली असती तर वेळ वाया गेला नसता.मराठी भाषेतून ही प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.

कार्य.अभियंता(पापू) :री-फार्म करावे लागणार आहे ते करीत नाही तो पर्यंत कामास गती येणार नाही.

श्री.राजू शिंदे :विरोधी पक्ष नेता यांनी पत्र देवून करारनाम्याची प्रत मराठी भाषेतून देण्याची मागणी केली प्रत देता येत नाही त्यावर उत्तर दिले महापालिकेच्या नियमावली मध्ये स्पष्ट म्हटले आहे की मराठीतून कामकाज चालेल. मराठी भाषेतून प्रत द्यावी दोन दिवस अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा त्यानंतर ही सभा बोलवावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.काशिनाथ कोकाटे :१.५० कोटी ई-टेंडरिंगवर योजनेसाठी खर्च केले. परंतु अद्याप कार्यान्वित केले नाही.

श्री.अफसर खान :ई-गव्हरनर्स म्हणजे काय सर्व समजून सांगावे.

कार्य.अभियता(पापू) :ई-गव्हरनर्स म्हणजे जसे मागिल वेळेस कल्याण डोंबीवली महानगरपालिकचे सॉफ्टवेअर तयार करून जन्म-मृत्यू प्रमाणपत्र नोंदणी करणे, मालमत्ता कराचा संदर्भात नोंदणी करणे, या सर्व गोष्टी पेपरलेस करण्यासाठी करावे लागेल.

श्री.प्रशांत देसरडा :त्याचा व या योजनेचा काय संबंध येतो.

श्री.अफसर खान :ई-गव्हरनर्स व या योजनेचा संबंध नाही ज्यांना या विषयी माहिती आहे त्यांचेकडून माहिती घ्यावी.

श्री.प्रमोद राठोड :ई-गव्हरनर्स म्हणजे काय आणि समांतर जलवाहिनी व ई-टेंडरींगचा काय संबध स्पष्ट माहिती दयावी.

कार्य.अभियंता(पापू) :ज्या अटी शर्तीनुसार कर्ज पुरवठा होतो त्या नुसार हे री-फॉर्ममध्ये येते. री-फॉर्मस् करणे आवश्यक आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापुर्वी ई-टेंडरींगवर दीड कोटी खर्च झाले.योजना चालू झाली नाही पुन्हा ई-गव्हरनर्सचा मुद्या मांडला जातो.

श्री.प्रफुल्ल मालाणी :त्याचा संबंध आहे. ई-गव्हरर्नर व इतर गोष्टी पुर्ण केल्या नाही तर शासनाचे अनुदान मिळणार नाही. अशी माहिती आहे.

श्री.समीर राजूरकर :या शहरासाठी किती पाणी पुरवठा होणार, किती पाणी लागणार प्रत्येक दिवशी किती पाणी येणार किती २४ तास पुरवठा होणार, टेंडर झाल्यानंतर काम सुरू करणे आवश्यक होते. मुळ योजने संदर्भात माहिती द्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :पावर पॉईन्ट प्रेझेन्टेशन दाखविणे बाकी आहे ते झाल्यानंतर चर्चेला वेळ द्यावा.

कार्य.अभियंता(पापू) :कर्ज मंजूर करतांना जे महापालिकेने जे री-फॉर्मस् होते त्याची यादी आहे त्या त्या विभागाने त्याची पुर्तता करायची ते केले नाही तर पुढील कर्जाचे हप्ते मिळणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रेझेन्टेशन पुर्ण झाले आता सर्वांना बोलण्याची संधी दयावी.

श्री.सुशिल खेडकर :आताच समांतर योजने संबधी प्रेझेन्टेशन नुसार माहिती दाखवली.एजन्सी कडे काम देवून ६ महिणे झाले.पैठण ते औरंगाबाद समांतर लाईन टाकणार व प्रत्येक दिवशी नागरीकांना पाणी देणार होते त्यानंतर वसुली करणार होते.या योजनेला कुणाचा विरोध नाही परंतु ज्या पध्दतीने ही योजना कार्यान्वित व्हायला पाहिजे तशी झालेली नाही. त्यामूळे अनेक अडचणी निर्माण झाल्या ठरल्यानुसार पाणी मिळत नाही असे असतांना पाणीपट्टी वसुल करण्याचे काम एजन्सी करीत आहे ते काम थांबविण्यात यावे.वसुली महापालिकेच्या मार्फत करावी.समांतर मार्फत जेंव्हा पासून पाणीपुरवठा होतो सर्व विस्कळीत झाले महापालिका यात लक्ष देत

नाही.मीटर बसविणार ३० दिवस २४ तास पाणी देणार होते ते अगोदर कंपनीने करावे त्यानंतर कंपनीने वसुली करावी.

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासनाने पी.पी.पी.मॉडेल बद्दल खुलासा करावा.

श्री.मुजीब खान :कपंनीकडून वाढीव बील दिले जाते ते थांबवावे. जलवाहिनी टाकण्यास ७ वर्ष उशीर झाला पाणी दिले नसतांना कंपनी वसुली करीत आहे. ५-७ वर्ष उशीर झाला यास जबाबदार कोण आताच खुलासा केला मनपाचे अभियंते दिले,ऑडीटर बाहेरचे दिले जाणार तो खर्च महापालिकेने दयायचा शासनाचे अधिकारी महापालिकेत आहे त्यांचेकडून ऑडीटरचे काम करून घ्यावे.प्रत्येक कामासाठी बाहेरचे अधिकारी नेमले जातात त्याचा खर्च महापालिकेवर पडतो. यापुर्वी अनेक योजना खाजगी एजन्सीला दिल्या एकही यशस्वी झाली नाही. सर्व केसेसचा निकाल विरोधात गेला आज सुध्दा एका प्रकरणात ७ कोटी देण्याचा निकाल कोर्टाने दिला प्रशासन सक्षमपणे कोर्टात बाजू मांडत नाही.महापालिकेच्या विरोधात निकाल जातो मनपाचे नुकसान होते ७ वर्षाचा कालावधी गेला समांतरचे काम होत नाही कोण जबाबदार आहे.सी

श्री.अफसर खान :यापुर्वी ए.एम.टी, रॅमके कंपनीबरोबर करारनामा केला. त्या प्रकरणात महापालिकेला पैसे भरावे लागले जो करारनामा होतो तो कंपनीच्याच हिताचा या योजनेत तसेच पध्दतीने करारनामा केला याचा बोजा नागरीकावर पडणार आहे. पैठण ते औरंगाबाद पर्यत पाईप लाईन होत नाही तोपर्यत कंपनीकडे ही योजना हस्तांतर करू नये. कंपनी वसुली करीत आहे ते त्वरीत थांबवावे महापालिकेने वसुली करावी. करारनाम्यानुसार ३० दिवस २४ तास दररोज पाणी मिळावे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.ना.पालकमंत्री यांनी स्पष्ट म्हटले की कंपनीकडुन वसुलीचे काम काढावे व पाणी पुरवठा वितरण ही महापालिकेने करावे.

या वेळी स.सदस्य मोठमोठयाने बोलत असतात.काहीही स्पष्ट ऐकू येत नाही.

श्री.अफसर खान :मा.पालकमंत्री यांनी म्हटले असेल परंतु सभागृहाने निर्णय घ्यावा आपणाला सर्व अधिकार आहे कंपनी कडून होत असलेले वसुलीचे काम थांबवावे.कंपीनीचे कर्मचारी वसुली करतांना दादागिरी करून अरेरावीची भाषा करतात नागरीकांना मारहाण करतात.

मा.महापौर :महापालिकेच्या मार्फत वसुली करण्यात येईल.

श्री.अफसर खान :३० दिवस दररोज पाणी द्यावे. मीटर बसवावे.पाच हप्त्यात मीटरचे रक्कम ग्राहकाकडून वसुल करणार. करारनाम्यात दुरूस्ती करावी यापुर्वी मी म्हटले होते नागरीक मीटरचे शुल्क देणार नाही कंपनीच्या स्वखर्चाने ते बसवावे.जोपर्यत ३० दिवस पाणी मिळत नाही तोपर्यत कंपनीकडील वसुलीचे काम थांबवावे महापालिकेने वसुली करावी पाणी वेळेवर येत नाही मस्जीद,मंदीर व इतर सार्वजनिक उपक्रमासाठी पाण्याची मागणी केल्यास अगोदर पैसे भरावे असे कंपनीकडून सांगण्यात येते.

श्री.नासेर खान :सभागृहाला अधिकार आहे योग्य निर्णय घ्यावे. मराठीतून कामकाज चालते असे असतांना बुक इंग्रजी भाषेत का देण्यात आले. पाणीपुरवठा होत नाही पत्र दिले कार्यवाही केली नाही तसेच पाणीपुरवठा विभागात ३३१ कोटीचा घोटाळा पेपरमध्ये आले. त्यातील १२२ कोटी कुठे गेले.सर्व माहिती दयावी. पेपरला आलेले घोटाळे सचिवांनी वाचून दाखवावे.

श्री.हुशारसिंग चव्हाण :सभा कामकाज नियमावलीमध्ये स्पष्ट दिलेले असतांना मराठीतून का याची प्रत दिली नाही.

श्री.समीर राजूरकर : सन २००६ पहिल्यांदा प्रोजेक्ट युआयडीएसएसएमटी अंतर्गत पाठवला त्यावेळी मा.आयुक्त दिलीप बंड होते. प्रोजेक्ट दिला त्यावेळी असे म्हटले की सन २०३८ पर्यत ३८५ एमएलडी पाणी लागणार आताच माहिती देतांना सन २०४१ पर्यंत ३४८ एमएलडी पाणी लागणार असे सांगण्यात आले. किती पाणी लागणार आहे निश्चिती करून घ्यावे. पाणी आरक्षणासाठी नाशिक, नगर येथील लोकांनी शासनाची जी वॉटर आरक्षण अधिकार समितीला पत्र देवून ३-३ वर्षापर्यतचे पाणी त्यांनी त्यांचेकडे असलेले धरणात आरक्षीत केले. १४३ दलघमी पाणी लागणार आताच खुलासा केला तर एका वर्षासाठी किती? २०३८ पर्यत किती पाणी लागणार यांचे नियोजन व्हावे. या योजनेच्या मुळ गोष्टीत चुक होऊ नये. ३ वर्षाकरीता पाणी आरक्षीत ठेवण्याचे वॉटर युटीलिटी कंपनीला पत्र दिले का? ५-५ वर्षासाठी पाणी आरक्षीत ठेवण्यासाठी धरणाच्या वरील भागातील नागरीकांनी पत्र दिले त्यामुळे खालच्या भागात पाणी येणार नाही. १४३ दलघमी जे पाणी लागते तेही मिळणे अवघड होईल. १३५ लि.पाणी प्रत्येक दिवशी की प्रत्येक आठवडयात देणार स्पष्ट उत्तर मिळत नाही. मराठीतून एक टिप्पणी दिली होती त्यात प्रतिदिन प्रति व्यक्ती १३५ लि. पाणी देणार म्हटले त्या प्रमाणे पाणी देणार का? प्रोजेक्ट रीपोर्ट काय होता? सन २००९ पहिला ड्रॉफ्ट केला सभागृहाच्या समोर आले नाही. का लपवतात? त्यामध्ये असे म्हटले की दिनांक २१-१२-०९ च्या ठराव क्र. ७७५ नूसार ड्रॉफ्ट कन्सेशन करारनामा केला आणि आरएचपीला मान्यता दिली. जेंव्हा विषय येतो त्यावेळी सर्व कागदपत्र का दिली जात नाही. करारनामा काय केला होता सभागृहला माहिती द्यायला पाहिजे. करारनामा केला आता त्याची प्रत दिली त्यात कितपत बदल करणे शक्य आहे सभागृहापासुन या गोष्टी का लपविल्या गेल्या. सन २००६ इतकी कॉस्ट होती २००९ ला इतकी झाली करारनामा केला सभागृहाला दाखवले नाही. आताच खुलासा करतांना म्हटले की स्वतंत्र इंजिनिअरची नियुक्ती केली ते करतांना टेंडर मागविले का ? वॉटर मॅन्युअल तसेच नॉर्म्स बघीतले का? केंद्र सरकारने नमुद केलेल्या मार्गदर्शक तत्वाला धरून त्या एजन्सीचे वॉटर मॅन्युअल मध्ये इतके काम होते का? सर्वाच्या सम्मतीने सुचना की या योजनेचे काम फेज-१ मध्ये जायकवाडी ते नक्षत्रवाडी व फेज-२ शहरातील लाईन टाकणे असे करता

येणे शक्य होते. योजनेच्या विरोधात कुणी नाही राज्य व केंद्र शासनाने निधी दिला आहे परंतु योजनेच्या कार्यपध्दतीवर अक्षेप आहे. यात फेज-१ फेज-२ या दोन टप्प्यात काम करावे अगोदर जायकवाडी पंपींग स्टेशन पासून नक्षत्रवाडी डीपीआर पर्यंत लाईन टाकावी. फेज-२ मध्ये शहरातील लाईन टाकाव्यात. स्थायी समितीने एजन्सी फिक्सींग केले दोन कंपनीचे वेगवेगळे पाईपचे हॉयड्रोलिक मॉडेल तयार करणार असे नियमीत सांगून कन्फ्युजन का केले जाते. जर जायकवाडी ते नक्षत्रवाडीपर्यत लाईन २२०० एमएमची असेल तर हायड्रोलिक मॉडेल कितीच्या इंचीच्या पाईपलाईनला चालेल याची कल्पना यायला पाहिजे. आताच म्हटले की केंद्र शासनाच्या व राज्य शासनाची मान्यता घेवून हया Combinaton of एसडीपी आणि डीआय पाइप असे इतिवृत्तांत आहे. एसडीपी व डीआय पाईपची प्रत्येक रनींग फुटची किमंत किती? जो डी.एस.आर. आहे तो डि.एस.आर. हा ७९२ कोटीच्या वेळेसचा २००९ चा आहे. यात बाहेरील ऑडीटरची नेमणुक करणार महापालिकेत ऑडीट ऑफिसर आहे. कंपनीने काय काम केले किती केले ते तीन महिण्याचे ऑडीट समोर यायला पाहिजे होते ते का आले नाही. मागिल वर्षी १० टक्के पाणीपट्टीत वाढ केली कन्सेशन पीरीयड ३ वर्ष आहे त्यानंतर दर तीन वर्षानी २५ टक्के वाढ होणार असे सर्वसाधारण सभा ठराव क्र.५५४ नुसार म्हटले असे असतांना दर वर्षी १० टक्के वाढ का होत आहे. योजना चांगली असते त्याची कार्यपध्दती ही चांगली राबविली पाहिजे. तसे न होता झालेल्या चुका नगरसेवकांच्या माथी मारल्या जातात. रॅमकेचे काम बंद पडले,एएमटी बस सेवा बंद झाली करारनामा व्यवस्थीत केला नाही तर नंतर कोर्ट प्रकरण होते. या गोष्टी न होण्यासाठी योजनेचे दोन भाग फेज-१ मध्ये जायकवाडी ते नक्षत्रवाडी लाईन टाकाणे, फेज-२ मध्ये शहरातील लाईन टाकाव्यात. २०४१ साली किती पाणी लागणार आहे तसेच शासनाची जलबोर्ड आरक्षण समिती असते त्यांना किती पाणी राखीव ठेवण्याचे कळविले सर्व माहिती दयावी.

श्रीमती किर्ती शिंदे :यापुर्वीही समांतर जलवाहीनीवर सभा झाली होती. आताही सभा होते. समांतरचा प्रस्ताव मंजूर केला करारनामा केला. हस्तांतरीत केले. हात कापून दिले. समांतरकडे काम दिल्यापासून पाण्याच्या बाबतीत जास्तीच्या समस्या निर्माण झाल्या शिवाय वाढीव पाणीपटटी देवून नागरीकांवर भुर्दंड लागतो आहे. करारनाम्यानुसार सर्व काम पुर्ण होईल तेंव्हा वसुलीचे काम कंपनीने करावे ज्यावेळेस पाणी येणार नाही अशा दिवशी एजन्सीने त्या भागात मोफत टॅकरने पाणी दयावे.

श्री.प्रशांत देसरडा :सन २००९ ला प्रस्ताव आला त्यानुंसार करारनामा जो करणार होते ते सभागृहासमोर येऊन त्यानंतर टेंडर करावे अशी मागणी केली होती. करारनामा केला त्यावेळी असेच स्क्रीन वर दाखविले होते.पीपीपी करतांना केंद्र शासनाने नियोजन करण्याचे सांगितले त्यात अमुक बाबीची पुर्तता

केल्यानंतर पीपीपीवर योजना करू शकतो हे लक्षात आल्यानंतर पीपीपीवर असलेली योजना सोडली पीपीपी तत्वावर योजना राबविण्यास केंद्र शासनाची मान्यता नाही. असती तर योजना सुरू करण्याला अडचण आली नसती. पी.पी.पी. कोर्टुन आले लक्षात आले नाही. महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा केला परंतु अशी योजना शासनाकडे नाही. देशात पीपीपी योजना कुठेही नाही. पी.पी.पी.बाबत काही तत्वे आहेत ते केले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :पीपीपी तत्वावर योजना राबविण्याला केंद्र शासनाची मंजुरी आहे की नाही खुलासा घ्यावा.

श्री.प्रशांत देसरडा :पीपीपी योजनेला केंद्र शासनाची मान्यता आहे का?

शहर अभियंता :मुळ योजना ही रु ३५९ कोटीची होती त्यास पीपीपी तत्वावर केंद्र शासनाची मान्यता आहे केंद्र शासनाचा या संबधी एक स्वतंत्र विभाग आहे त्यांनी पीपीपीचा पुर्ण मॉडल तयार करून दिले केंद्र शासनाच्या आदेशानुसार क्रिसीलला मंजूरी झाली होती.पीपीपी मॉडल तयार करण्यासाठी केंद्र शासनाने निधी दिला.

श्री.प्रशांत देसरडा :पीपीपी योजनेला निधी दिला नाही युआयडीएसएसएमटी अंतर्गत असलेल्या योजनेला निधी मिळाला.

शहर अभियंता : पीपीपी मॉडलला केंद्र शासनाने, राज्य शासनाने मंजूरी दिली दर तीन महिण्याचा प्रोग्रेस रिपोर्ट शासनाकडे पाठवितो त्यात केंद्र शासन नवीन काही सुधारणा होत असते.

श्री.प्रशांत देसरडा :केंद्र शासनाकडून जो निधी आला तो पीपीपी मध्ये वर्ग करण्यासाठी राज्य शासनाकडे पत्र का देण्यात आले.

शहर अभियंता :जे काम महापालिकेचे आहे ते जर खाजगी एजन्सी करणार असेल तर शासनाची त्यासाठी परवानगी घ्यावी लागते.

श्री.प्रशांत देसरडा :नगरविकास विभागाकडे जेंव्हा प्रस्ताव मांडला त्यावेळी शासनाने असे म्हटले की केंद्र शासनाच्या मंजूरीशिवाय प्रस्ताव घेवू नये असे असतांना सन २००९ ला सर्वसधारण सभेची मान्यता घेवून प्रस्तावास मंजूरी घेतली.

शहर अभियंता :तत्कालीन मा.महापौर श्रीमती विजया रहाटकर मा.आयुक्त शहर अभियंता व कार्य.अभियंता यांचेसह नगरविकास मा.सचिव श्री.मनुकुमार श्रीवास्तव यांच्या सोबत बैठक झाली त्या बैठकीत असे ठरले की रू.३५९ कोटीची ही मुळ योजना आहे. तीन वर्षानंतर या योजनेची किमत वाढेल व महापालिकेची परीस्थिती बरोबर नसल्याने महापालिकेच्या हिस्साची रक्कम महापालिका टाकू शकणार नाही. म्हणून ही योजना पीपीपी अंतर्गत राबवावी असे ठरले व तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवून मंजूरी घेतली व पुढील कार्यवाही केली. त्याचे सर्व इतिवृत्त देतो.

श्री.प्रशांत देसरडा :त्या बैठकीचे इतिवृत्त असेल, पीपीपी योजनेला केंद्र शासनाची मंजुरी असेल तर अभिनंदन, दुसरा मुद्या असा की, नागपूर ऑडीट विभागाने लेखा परीक्षण केले तेंव्हा लेखा विभागाने खर्चाचा अहवाल न देता

पाणीपुरवठा विभागाने दिला ही गंभीर बाब आहे या संदर्भात स.आमदार श्री.वाणी साहेब यांनी विधान सभेत लक्षवेधी सुचना मांडली तेंव्हा त्यावेळचे मा.मुख्यमंत्री यांनी औरंगाबाद मनपाची समांतर योजना कशी होते माहित नाही परंस्पर करारनामा केला असे म्हटले शासनाची एनओसी का घेतली नाही.समांतरच्या बाबतीत जो करारनामा केला तो बरोबर आहेत का याची चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त मा.न्यायाधिशाची नियुक्ती करावी अहवाल घ्यावा नंतरच समांतरचे काम चालू करावे.

श्री.प्रमोद राठोड :केंद्र शासनाने १४४ कोटी पहिला हप्त्याचे अनुदान आले उर्वरित अनुदान येण्यासाठी जे रिफार्मस् दिले ते करावे लागतील असे म्हटले त्यासाठी प्रशासनाने काय तयारी केली ही माहिती नागरीकांना किंवा नगरसेवकांना दिली नाही. रिफार्मस् करणार नाही तोपर्यत पुढील दोन हप्ते मिळणार नाही.ते मिळाले नाही तर विकासकाने खर्च करायचे व ती रक्कम नागरीकांकडून वसुल करायची. रिफार्मस् मध्ये अनिवार्य सुधारणा व ऐच्छिक सुधारणा असे आहे यासाठी प्रशासनाने काय प्रयत्न केले तसेच ई-गव्हनर्स म्हणजे नेमके काय करायला पाहिजे. डबल अकाऊटींग म्हणजे काय? मालमत्ता कर किती वसुली व्हायला पाहिजे जे की रिफार्मस् मध्ये अटी व शर्ती दिल्या त्या पुर्ण होतील. पुढील हप्ते आले नाही तर नागरीकावर बोजा टाकणार आहोत का?

शहर अभियंता :रिफार्मस् मध्ये अनिवार्य सुधारणा व ऐच्छिक सुधारणा या गोष्टी आहेत. सात आठ अटी दिल्या या सुधारणा कर्ज मिळण्यासाठी नाही चुकून खुलासा झाला असेल. याच योजनेचे नव्हे तर यापूढे कोणत्याही योजनेचे ग्रँट येण्यासाठी रिफार्मस् म्हणजे येथील सेवेचा स्तर वाढविणे असा होतो आणि तो वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे अनिवार्य ऐच्छिक सुधारणा करणे या करिता दिले शासनाचे अनुदान येण्यासाठी अट असणार आहे. जे रिफार्म दिले त्यात सुधारणा करण्यासठी उपआयुक्त (म) यांचे अध्यक्षतेखाली एक सेल तयार केला. ज्या ज्या विषयाच्या संबंधीत जे जे अधिकारी असतील उदा.इ-प्रशासन असेल तर प्रशासन विभाग येतील बरेचशे रिफार्मस् केलेले आहे. ई-प्रशासन म्हणजे पेपरलेस सिस्टीम कार्यान्वित करणे, जवळपास ई-गव्हर्नस चा हा प्रकार आहे महाराष्ट्रात पहिल्यांदा या महापालिकेने ई-टेंडरीग सुरू केली. हेल्थ विभागाचे जन्म-मृत्यु प्रमाणपत्र या पध्दतीनुसार दिले जाते कालांतराने इतर विभागाचे व आवक जावक पत्र सुध्दा ई-प्रशासन मध्ये कार्यान्वित होतील.

श्री.रेणुकादास वैद्य :पेपर लेस होईल वगैरे या सुचना २००७ पासून ऐकतो परंतु ई-टेंडरींगची योजना कार्यान्वित का केली नाही.

श्री.प्रमोद राठोड :ई-गव्हर्नर वर २.५० कोटी खर्च केले रिफार्म कधी पुर्ण करणार आहे.

मा.उपमहापौर :ई-आरपी वर प्रमुख नेमू शकलो नाही. २-३ महिन्यानंतर एक-एक अधिकारी बदलले.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.प्रमोद राठोड :पुढील अनुदान मिळेल की नाही शंका येत आहे.

शहर अभियंता :ईआरपी व्यवस्था पाहिजे पुढचे रिफार्म बरेचशे दिले. अकाऊंट सिस्टीमचे बरेच काम झाले मालमत्ता संदर्भात रिंफार्म असा की ९० टक्के प्रोव्हीजन व ८५ टक्के मालमत्ता कर वसुल झाला पाहिजे.त्या दृष्टीने प्रयत्नशील आहोत.

श्री.रेणुकादास वैद्य :दिनांक २२-३-२०११ च्या स्थायी समितीमध्ये समांतरचा प्रस्ताव होता त्यात २-३ सुचना मी मांडल्या.१. मीटरचा बोजा नागरीकावर टाकून पाणीपट्टीच्या माध्यमातून वसुल करणार काय? वसुली ऐजन्सी करणार काय तसेच योजनेचा कालावधी २० वर्ष देणार आहे त्यात प्रीपेड कालावधी ६ महिण्याचा दिला असेल तर योजनेचा मुळ कालावधी केंव्हा सुरू होतो.पहिल्या वर्षा पर्यंतचे काम बंद पडू नये ते कधी सुरू होणार व त्या कालावधीचे पेमेंन्ट कशा पध्दतीने अदा करणार आहे. पहिल्या वर्षाचे सुरू होणारे कामास किती कालावधी लागणार आहे.नागरीकांना पुर्ण वर्षभर पाणी केंव्हा देणार, जेव्हढे पाणी जास्त पुरविणार तेवढे बील कमी होणार असे म्हटले त्यावेळी बोलले जात होते त्याचा रेश्यूव्ह अद्यापही समजलेला नाही. २२ फुट उंच पाणी चढणार असे म्हटले तसे होणार आहे काय ? श्री पानझडे या योजनेचे पुर्वीपासून काम करताते त्यांचे मदतीला एक अधिकारी देणार होते त्याचे काय नियोजन केले. देयकेच्या बाबतीत महापालिकेचे या योजनेवर नियत्रंन असावे.० ते ५० टक्के वसुली ही काम पुर्ण झाल्यानंतर होईल.ही वसुली काम पुर्ण झाल्यानंतर करावी अशी आमची मागणी होती. तीच मागणी आजही आहे.मा.पालकमंत्री यांनी सुचना केली की वसुली ही महापालिकेने करावी.जेंव्हा समांतर एजन्सी २४ तास पाणी देईल तेंव्हा ते वसुली करतील.कंपनीने १००टक्के मिटर बसवावे त्यानंतर त्यांनी वसुल करावे आता सध्या महापालिकेने वसुली करावी.

श्री.अशोक बेहडे :पहिल्या वर्षी व शेवटच्या वर्षी कंपनीला किती रक्कम दिली जाणार आहे.

श्री.मधुकर सावंत :स्थायी समितीला प्रस्ताव होता मी ही सदस्य होतो.ही योजना पुर्ण झाल्यानंतर ३ वर्षानंतर मीटर बसून पाणीपट्टी वाढ होणार होती.परंतु पाणी येण्या अगोदरच जास्तीचे बील कंपनी देत आहे.कंपनीचे लोक दादागिरी करून वसुली करतात.तीन वर्षानंतर पाणीपट्टीत वाढ होणार होती इतिवृत्तांत आलेले आहे.

श्री.समीर राजूरकर :पाणीपट्टीची वसुली एजन्सी करणार की महापालिका खुलासा व्हावा.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :अनेक भागात पाणी येत नाही वसुलीचे काम कंपनीकडे कसे दिले.

श्री.महेश माळवतकर :करारनाम्यात दुरुस्ती करावी या संदर्भाने विभागीय आयुक्ताकडुन पत्र आले का? शहरातील जनता पाण्यासाठी व्याकुळ झाली योजना आणायची जबाबदारीने निर्णय घ्यायला पाहिजे नसता स्पेक , एएमटी बस सेवा याची जशी परीस्थिती झाली तशी होऊ नये.खाजगी एजेन्सी ७-८ महिने

काम करते पळून जाते हा अनुभव महापालिकेला आलेला आहे. पाणी देण्यासाठी काय करता येईल ते करावे.आता करारनाम्यात सुधारणा करता येतील का ? १ सप्टेंबर २०१४ ची ही योजना एजन्सीला हस्तांतर केली तेंव्हापासून जनतेला वाईट अनुभव येत आहे महापालिका यातून मूक्त झाली अधिकारी यांनी हात वर केले. परंतु अनेक वसाहतीमध्ये ४ दिवसा आड पाणी येते, जेथे पाणी येत नाही अशा ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करावा इतर सार्वजनिक उपक्रमाच्या वेळी पाणी लागल्यास ते पुरविण्याची जबाबदारी कंपनीची आहे.महापालिकेला पाणी विकत घ्यावे लागते. असा करार केला हे योग्य नाही. मीटरची किमंत ८००-९०० रू असतांना त्याची ४०००-५००० हजार किंमत लावून नागरीकांकडून वसुल करणार काय? संपुर्ण योजना कार्यान्वित केल्यानंतर २५ टक्के पाणीपट्टीत वाढ होणार होती त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.वसुली महापालिकेने करावी.जेथे वसुली होते तेथेच हे प्रयोग केले जातात.जे मोठे थकबाकीदार आहे तेथे वसुली अगोदर कावी. योजना बंद होऊ नये जे दोष असतील त्याचा निपटारा करावा योजना कार्यान्वित होण्यासाठी तातडीने पावले उचलावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :समांतर एजन्सीने वसुलीचे काम सुरू केले परंतु काम करण्याचे आदेशीत केले का पाणीपट्टीची वसुली मनपाने करावी टँकरचे दर रु.७५० प्रमाणे ठरलेले आहे त्यात वाढ होऊ नये.समांतर एजन्सी गुंठेवारी भागात कामे करणार की नाही सर्व खुलासा करावा.

श्री.मीर हिदायत अली :करारनामा केला त्याप्रमाणे विकास कामे सुरू करायला पाहिजे तसेच एजन्सीने करावयाची कामे व पेमेंन्ट देणे बाबत करारनामा पान क्र.१३८ वर चार्ट दिला.१०० टक्के पाणी देणार त्यानंतर वसुली करणार होते परंतु त्या अगोदरच वसुलीचे काम सुरू केले २५००रू ची डायरेक्ट २७५० केले ती वाढ न होता अगोदर पाणी पुरवठा करायला पाहिजे होते.आता त्यात १० टक्के वाढ करून ३०५० रू पाणीपट्टी केली. दोन टप्प्यात या योजनेचे काम व्हावे शहरामध्ये एजन्सीचे लोक दादागिरी करून वसुली करीत आहे शहरातील वसुलीचे काम एजन्सीकडून काढून घ्यावे महापालिकेने वसुली करावी.मा.पालकमंत्री यांचे सुध्दा याप्रमाणे आदेश आहेत.

श्री.हुशारसिंग चव्हाण :औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी या एजन्सीने निविदा भरलेली होती का?एजन्सीचे संचालक मंडळाची नावे जाहीर करावी.

श्रीमती प्रिती तोतला :यापुर्वीही समांतर बाबत सभा घेतली करारनामा इंग्रजीमध्ये दिला होता ही प्रत मराठी भाषेतून द्यावी. असे त्यावेळी म्हटले होते नागरीकांना सोप्या सरळ भाषेत आम्हाला या योजनेची माहिती देता येईल. समांतर एजन्सीने अगोदर काम करावे त्यानंतर वसुली करावी असे ठरले होते. एजन्सीला काम देणेपुर्वी जी थकबाकीची रक्कम सुध्दा एजन्सीच वसुली करीत आहे तो पैसा मनपाच्या तिजोरीत येतो का? या योजनेत संबधीत ठेकेदाराने किती रक्कमेची आतापर्यत गुंतवणुक केली. पुर्वी ज्या भागात पाणी येत

नसे तेथे महापालिका टँकरने पाणी देत असे आज परीस्थिती अशी की शाळा, दवाखाना येथे टँकरने पाणी विकत घ्यावे लागते. करारामध्ये दुरूस्ती होणार असेल तर गोरगरीबांसाठी टँकरचे दर कमी करावे तसेच वार्डातील जेथे लिकिजेस असेल ती देखभाल दुरूस्तीची कामे ताबडतोब सुरू करावी नवीन लाईन टाकण्याचे काम करावे.

श्री.गजानन बारवाल :सर्वांचा प्रश्न एक आहे मुद्ये वेगवेगळे मांडलेले आहे. करारनाम्या नुसार या योजनेची कामे व्हावी. कंपनी जलवाहिनी टाकण्याचे काम केंव्हा पासून चालू केले कुठे काम पुर्ण झाले. किती ठिकाणचे लिकिजेस काढले, वसुली किती केली त्यापैकी मनपास किती रक्कम मिळाली वसुली झालेली रक्कम कुठे जमा आहे.

श्री.त्रिंबक तुपे :पाणी पुरवठयाची काही कामे होणार होती. ३-३ वर्षापुवीची कामे आहे काम का होत नाही विचारणा केली असता संमातर एजन्सी काम करणार असे सांगण्यात येते. थांबविलेली विकास कामे केंव्हा सुरू होणार आहे. सविस्तर माहिती द्यावी.

डॉ.जफर खान : औरंगाबाद शहरातील नागरीकांना मुबलक पाणी मिळावे या हेतूने ही योजना कॉंग्रेस आघाडी सरकारने मंजूर केली. वृत्तपत्रात बातम्या येतात की, वसुली साठी एजन्सीच्या लोकांकडून नागरीकांना त्रास होत आहे हे बरोबर नाही. या पुर्वी सुजल निर्मल योजने अंतर्गत ४० कोटीचा निधी मनपास मिळाला त्यातून काम सुध्दा केले तो खर्च समांतर च्या खर्चात वर्ग केला की ती रक्कम वजा करून घेतली ?

श्री.रेणुकादास वैद्य :ही योजना २० वर्षाकरीता आहे. सभागृहाची मागणी आहे की या योजनेच्या कामासाठी डीआय पाईप वापरावे. दुसरे पाईप वापरू नका.

श्री.गिरजाराम हळनोर:गुंठेवारी भागात व इतर धार्मीक व सामाजिक उपक्रमासाठी पाण्याची मागणी झाल्यास तेथे मोफत पाणी देण्यात यावे. या योजनेचे काम करतांना डीआय पाईपचा वापर करावा. महापालिकेने वसुली करावी वितरण मनपाने करावे त्यावर कन्ट्रोल असावे. नळ कनेक्शन देतांना प्लबंर च्या मार्फत काम करून घ्यावे. कंपनीचे काम कुठपर्यत आले आहे या योजनेवर रेखरेख महापालिकेचे असावे. पदाधिकारी, स.नगरसेवक समांतरचे अधिकारी, मनपाचे अधिकारी यांचे उपस्थित एक कमेटी तयार करावी. अहवाल सभागृहा समोर यावा.

श्री.विजय वाघचौरे :कंपनीने आतापर्यंत किती वसुली केली मनपाच्या खात्यामध्ये किती रक्कम जमा झाली महापालिका अधिकारी व एजन्सीचे वादात आलेले ४ कोटी मनपाच्या खात्यात जमा केले नाही. त्यामुळे विकास कामे थांबलेली आहे ती होत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :३५९ कोटीची ही योजना पीपीपी तत्वावर राबविण्याचे ठरले.बीओटीवर असलेली योजना पीपीपीवर कशी झाली सर्वांना माहित आहे शहराच्या १४ लक्ष नागरीकांना आधारभुत माणुन करारनामा करायला पाहिजे होता.एजन्सीचे हित बघून करारनामा केला यापुर्वी रॅमकी ,स्पेक, एसटी

बस सेवा या माध्यमातून जसे नुकसान झाले तसे या योजनेत होण्याची शक्यता वाटते. वाढीव पाणी न देता दोन दिवसा आड पाणी येत असतांना वाढ केली.आताच म्हटले की ३० दिवस पाणी मिळेल. महिण्यातून आज १० दिवस पाणी मिळते.योजनेचे काम देतांना ९ एजन्सीच पुढे आल्या होत्या त्यात सुभाष प्रोजेक्ट ६३ कोटीमध्ये काम पहिल्या वर्षात काम करून देणार होते म्हणून ही एजन्सी लातूरला पाणीपुरवठयाच्या प्रकरणात ब्लॅकलिस्ट होती या एजन्सीला काम देणेमध्ये काय रहस्य होते.काळया यादीत असलेल्या एजन्सीला काम दिले गेले,काम दिल्यानंतर एजन्सीचे डायरेक्टर बदलले मुख्य भाग धारक होते ते आज नाही टेकओव्हर करण्याचे काम केलेले आहे.या एजन्सीने आतापर्यत कोणतीही कामे केली नाही पैसे मात्र दिले जात आहे हे चुकीचे असून जायकवाडी ते नक्षत्रवाडी फारोळा पर्यत लाईन टाकावी त्यानंतर शहरातील इन्टरनल लाईन कराव्यात दिं.२९-१०-२०१४ पासून अनेक भागात पाणी येत नाही पाण्याची वाढ केली नाही. दर तिन महिन्यानंतर कंपनीने केलेल्या कामाचा प्रगतीचा अहवाल घेतला नाही. मीटर कंपनी बसविणार होते. आता कंपनी मीटरचे पैसे आकारणार असे सांगण्यात येते. उदया जलकुभांपासून पाईपचा खर्च नागरीकांकडून वसुल करणार काय? महिन्यातून ३० दिवस पाणी दयावे वाढ करावी. कोणते पाईप टाकावे ते बोलले जाते जे करारनाम्यात आले त्याप्रमाणे व्हावे. दरमहा ५.२५ कोटी रक्कम देण्याचे बंद करावे. एजन्सीने कोणतेही काम केले नाही.मनपा व समांतर एजन्सी यांनी एकत्रित येऊन नियोजन करावे २४ तास पाणी दयावे त्यानंतर पाणीपट्टी वाढवावी तुर्त एजन्सीकडून वसुलीचे काम थांबवावे.

डॉ.नुझत तरन्नुम खान :मीटर बसविण्याचा खर्च कोण करणार आहे तसेच ज्यांचेकडे नळ नाही त्यांना टँकरद्वारे पाणी देणार आहे का? ज्या भागात लाईट व इतर कोणत्याही कारणामुळे पाणी येणार नाही अशा वेळी टँकरने पाणी पुरवठा करावा.

श्री.जगदीश सिध्द :करारनाम्यात ज्या त्रुटया आहेत त्या दुरूस्त कराव्यात त्यामूळे जनतेवर भार पडणार नाही. हा विषय पाहिजे होता. करारनाम्यातील क्र.०१ ते ३८ मध्ये नमुद केलेले सभागृहला समजावून सांगावे. इंग्रजी भाषेत दिलेले आहे त्यावेळी मी साक्षीदार म्हणून आहे. त्यावेळी मला परिस्थितीनुसार जिल्हाधिकारी कार्यालयात बोलविण्यात आले शहर अभियंता तेथे होते. फोन करून सांगितले होते.

श्री.किशोर नागरे :प्रशासनाचा या संबधी सर्व खुलासा घ्यावा.

या वेळी सभागृहात स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात काहीही स्पष्ट ऐकू येत नाही.

मा.महापौर :शहर अभियंता खुलासा करतील सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.जगदीश सिध्द :करारनामा करतांना मी साक्षीदार आहे मी समजूतदारपणे बोलतो जनतेचे विचार मांडतो. जनता दोष देत आहे. जनतेच्या हिताच्या दृष्टीने यात दुरूस्ती करावी.

या वेळी सभागृहात स.सदस्य मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.किशोर नागरे :हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न असून यावर प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

श्री.जगदीश सिध्द :महापालिकेचे खाजगीकरणातून जे प्रोजेक्ट झाले ते फेल झाले हा प्रोजेक्ट फेल जाऊ नये म्हणून पोटतिडकीने बोलतो आहे जनतेच्या भल्यासाठी बोलतो आहे.या बैठकीचा विषय घेवून कुणी कोर्टात गेल्यास करारनामा मान्य आहे असे होईल.हा करारनामा मान्य नाही नागरीकाच्या हितासाठी या करारनाम्यात दुरूस्ती करावी. या करारनाम्यात मी साक्षीदार आहे मला साक्षीदार म्हणून कोर्टात जावे लागेल मी माफिचा साक्षीदार होण्यास पण तयार आहे. परंतु करारनाम्यात आजच दुरूस्ती करावी.

या वेळी मोठमोठयाने स.सदस्य बोलत असतात.

मा.महापौर :यामध्ये आपण केलेली सुचनेनुसार दुरूस्ती करण्यात येईल.सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

शहर अभियंता :कन्सेशन ॲग्रीमेंन्ट झाले त्यात सुधारणा करणे शक्य आहे का असा सर्वाचा प्रश्न आहे. कन्सेशनर व महापालिका यांनी एकत्रिक बसून आपआपसात चर्चा करून तडजोड करून ते सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने सुधारणा करता येतील.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.मुजीब खान :स.स्थायी समितीच्या सदस्यांची दबावाखाली सही घेतली.कुणाच्या दबाव होता कुणी त्यांना बोलवले होते नाव सांगावे.

शहर अभियंता :कोणत्याही करारनाम्यावर स्थायी समितीच्या दोन सदस्यांची साक्षीदार म्हणून सही घ्यावी लागते आणि कायदयानुसार त्यावेळी स.सदस्याच्या सही घेतली.

श्री.समीर राजुरकर : किती पाणी आरक्षीत केले?

---

श्री.राजू शिंदे :या सभांचे इतिवृत्त मंजूर करतांना यावर मा.सभापती यांनी स्वाक्षरी घ्यावी असे म्हटले होते. परंतु सभापतीनी मंजुरी द्यायची, मा.महापौर असेल मा.सभापती असेल यांनी मंजूरी दिल्यानंतर त्या त्या प्रोजेक्टच्या वेळी असे करतांना त्या वेळचे सभापती किंवा महापौर यांचे स्वाक्षरी यायला पाहिजे तसे केले नाही.

शहर अभियंता :कायदयाप्रमाणे करारनामा केलेला आहे त्या बाहेर जाऊन केला नाही.

श्री.राजू शिंदे :कायदा आम्हाला माहित आहे.यावर स्थायी समिती सभापती यांनी स्वाक्षरी घेतली नाही फक्त शिवसेनेचे स.सदस्यांची स्वाक्षरी घेतली ते ही त्यांना काहीच माहित नसतांना फोनवरून बोलवून सही घेतली आताच स.सदस्य श्री.जगदीश सिध्द यांचेवर दबाव टाकून तेथे बोलविले त्यांनी

| | |
|---|---|
| | कबूल केले. त्यांचे म्हणणे असेकी यात दुरूस्ती केली नाही तर कोर्टात जाऊन दिलेली साक्ष मागे घेईल.यावर प्रशासनाचे काय मत आहे |
| शहर अभियंता | :कायदयाप्रमाणे केले आहे. कोणत्याही दोन स्थायी समितीच्या सदस्याची स्वाक्षरी यासाठी लागते. अमुकच सदस्याची स्वाक्षरी असावी असे कायदयात नाही. |
| श्री.प्रफुल्ल मालाणी | :पाणी हा सर्वाच्या जिव्हाळयाचा विषय आहे त्यावर सविस्तर खुलासा घ्यावा. |
| शहर अभियंता | :करारनाम्याची प्रत मराठी भाषेतून करण्यात येईल व ती प्रत सर्व सदस्यांना देण्यात येईल. भाषा संचालनालयाकडून भाषांतर करून घेण्यात येईल. |
| श्री.समीर राजूरकर | :२००६ च्या या प्रोजेक्टमध्ये किती पाणी हे २०३८ पर्यंत आणणार होते. |
| शहर अभियंता | :आताच सदस्यांनी म्हटले की पाणीपट्टी ही सक्तीने वसुल करीत आहे संबधीत एजन्सीकडे गुंड प्रवृत्तीचे वसुलीसाठी लोक असतील तर त्याची चौकशी केली जाईल व तसे आढळून आल्यास कंपनी ठेकेदार यांना तंबी दिली आहे असे यापुढे होणार नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | :श्री.देशपांडे नावाचे अधिकारी कंपनीकडे आहे त्याचे अखत्यारीत वसुली करणारे कर्मचारी गुंड प्रवृत्तीचे आहे  हे प्रशासनाला माहित आहे. |
| शहर अभियंता | :वसुलीच्या संदर्भात मा.आयुक्त सोंबत बैठक झाली.महापालिकेचे संबधीत अधिकारी वार्ड अधिकारी तसेच कंपनीचे अधिकारी उपस्थित होते यावर सांगोपांग चर्चा झाली वसुलीच्या बाबतीत महापालिकेचे नियत्रंन असावे.वार्ड अधिकारी यांचे नियत्रंणाखाली ही वसुली करण्याचे सुचना आहे. |

या वेळी डायस समोर एकाच वेळी स.सदस्य बोलत असतात.

| | |
|---|---|
| मा.उपमहापौर | :कन्ट्रोल महापालिकेचे आहेच परंतु  वसुली ही महापालिकेने करावी. |
| शहर अभियंता | :वसुली करण्यासाठी १०० कर्मचारी लागेल कंपनीचे कर्मचारी द्यावे अशी मागणी केली महापालिका वसुल करणार,बळजबरीने वसुली करणार नाही.त्यासाठी मॅनपावर पाहिजे. |
| मा.उपमहापौर | :३ वर्षानंतर एजन्सी पाणीपट्टी वसुली करेल असे इतिवृत्तात दिले आहे. आहे.त्यापुर्वी एजन्सी का वसुली करीत आहे. |
| शहर अभियंता | :वसुलीवर महापालिकेचे नियत्रंन राहिल किती वसुली झाली हे वार्ड अधिकारी यांचे सहिने माहिती दिली जाईल. |
| मा.महापौर | :सभागृहाचे मत आहे की पाणीपट्टीची वसुली महापालिकेने करावी.या आदेशाचे पालन करावे. |
| शहर अभियंता | :ठिक आहे पाणीपट्टीची वसुली महापालिकेच्या तर्फे करण्यात येईल. |
| श्री.राजू शिंदे | :शहरात पाणी प्रश्न निर्माण होत होता. म्हणून ही योजना मागच्या बॉडीच्या काळात मा.खासदार यांचे कल्पनेतून समोर आली. ही योजना १६ स्थायी समिती सदस्यां समोर ठराव आला त्यावेळी  २४ तास पाणी २२ फुट पाणी उंच चढेल १८०० पाणीपट्टी घेतली जाईल मीटर बसविले |

जाईल व तीन वर्षानंतर पाणीपट्टीत वाढ होईल असे म्हटले होते. असे कार्य.अभियंता श्री.पानझडे यांनी म्हटले आहे. मीटर बसविल्यानंतर १००० लि. पाण्यासाठी ९रू आकारणी होईल सर्व सामान्य घरासाठी ८००-९०० वार्षीक पाणीपट्टी बील येईल असे म्हटले त्यामुळे त्यावेळी सभागृहाने या योजनेला मंजुरी दिली एसपीएमएल ला ही योजना दिल्याची मान्यता झाल्यानंतर ही औरंगाबाद वॉटर युटीलिटीकडे कशी दिली गेली. सभागृहास मान्यता दिली का? सर्व खुलासा करावा.

शहर अभियंता :१८००रू पाणीपट्टी होती ३ वर्षानंतरच वाढ केली आहे ३०५० रू पैकी त्यातील १२००रू हे महापालिकेलाच मिळणार आहे एसपीएमएलला मंजूरी मिळाल्यानंतर वाढ झाली शासनाने रि-फार्मस् करण्याचे सुचविले होते त्यानुसार वाढ झाली.

श्री.राजू शिंदे :१८००/-रू पाणीपट्टी होती तीन वर्षानंतर वाढ होणार होती ३०५० रू डायरेक्ट कसे केले.

शहर अभियंता :सर्वसाधारण सभेसमोर वाढीचा प्रस्ताव होता त्यास मंजुरी मिळाल्यानंतर वाढ केली.

श्री.राजू शिंदे :दर तीन महिन्याला कंपनीने केलेल्या कामाचा प्रोग्रेस/आढावा सर्वसाधारण सभा, स्थायी समितीला दिला जाईल असे म्हटले परंतु माहिती दिली नाही. ३० दिवस २४ तास पाणी देणार त्यानंतर वाढ करता येईल असे म्हटले होते.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी डायस समोर बोलत असतात.

शहर अभियंता :पाणी रिझर्वेशन १३८.०० एम.एम.क्युब एवढा आहे १४३ एम.एम.क्युब लागणार. मागणी नोंदविली. वर्षाला ५०-५५ एम.एम क्युब इतके लागते.

श्री.समीर राजूरकर :पाणी रिजर्व ठेवण्यासाठी समिती कडे पत्रव्यवहार केला काय ?

शहर अभियंता :पत्र पाठविले आहे दर वर्षी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीची बैठक होते ते पाण्याचे रिझर्वेशन ठरविते रिझर्व समिती पाणी देण्याचे ठरविते या समितीला महापालिकेकडून पत्र दिले आहे मा.पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली ही समिती असते दर वर्षी या बाबत समिती विचारणा करीत असते त्यानुसार पत्र दिले जाते महापालिकेसाठी १३८.०० एम.एम क्युब ऑलरेडी पाणी राखीव आहे. १४३ एम.एम क्युब पाणी लागणार आहे या योजने अंतर्गत २०३८ पर्यंतची परीस्थिती नुसार केले होते ३ वर्ष मंजुरीसाठी लागले त्यामुळे २०४१ च्या परीस्थितीनुसार ३९२ एमएलडी पाणी लागणार अशी योजना आहे.आज तेवढी पाण्याची गरज नाही २०० एमएलडीची गरज आहे त्याप्रमाणे नियोजन करीत आहे ३० दिवस पाणी हे तीन वर्षानंतर मिळेल दररोज २४ तास पाणी हे पाच वर्षानंतर असेल,कन्सेशन ॲग्रीमेंन्ट मध्ये बदल केले का असा प्रश्न केला किरकोळ बदल केला त्यामुळे महापालिकेचे कोणतेही आर्थीक नुसार होणार नाही. कन्सेशन करारनाम्याला मंजुरी या सभागृहाने दिली त्याचे इतिवृत्त उपलब्ध आहे. पाणी पुरवठयावर सन २०१३-१४ मध्ये कर्मचारी

लाईटबील व इतर खर्चावर ६८ कोटी गेले. महापालिका जे काम करीत होते ते काम आता कंपनी करीत आहे येणा-या वीस वर्षात ६३ कोटी प्रमाणे व ६ टक्केनी खर्च वाढवून किती जाणार त्याचे फिगर काढले. तर एवढाच खर्च महापालिकेला करावा लागला असता,पाणीपट्टीत जे १२५०रू वाढ केली ती रक्कम महापालिकेच्या तिजोरीत येणार आहे.

श्री.राजू शिंदे : १८००रू पाणीट्टी असतांना दररोज नंतर दोन दिवसात आड पाणी मिळत होते आता ३०५०रू देऊन ४ दिवसाआड पाणी दिले जाते

शहर अभियंता :जे रिफार्मस् दिले ते पुर्ण करावे लागणार आहे.

श्री.राजू शिंदे :चार दिवसा आड पाणी द्यावे व पाणी पट्टीत वाढ करावी असे शासनाने म्हटले का ?

श्री.रेणुकादास वैद्य :३०५० रू पाणीपट्टी केली दररोज पाणी का दिले जात नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :दररोज पाणी द्यावे ३६५ दिवस पाणी द्यावे जोपर्यंत तसे होत नाही १८०० वसुल करावे.वसुलीचे काम महापालिकेने घ्यावे.

मा.उपमहापौर :एक दिवसा आड पाणी तेंव्हा १८००रू ,होते कंपनीकडे योजना गेली आता आता दोन दिवसा आड पाणी येते तरी ३०५० रू घेतो एक लि.पाणी वाढ झाली नाही.तर कशाच्या अधारे वाढ केली.

शहर अभियंता :पाणीपट्टी दर हे खर्चावर अधारीत असतात.

मा.उपमहापौर :१८००रू होते तेंव्हा खर्च कमी येत होता काय? आज रोजी लाईन मनपाच्या आहे काय खर्च वाढला ?

शहर अभियंता :लाईट बील रॉ मटेरियलचे दर वाढलेले आहे त्यामूळे वाढ केली.

श्री.रेणुकादास वैद्य :दररोज पाणीपुरवठा होणार असेल तर या नुसार सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती.

श्री.जगदीश सिध्द :करारनाम्यात दुरूस्ती करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :दररोज पाणीपुरवठा करणार असेल तर १० टक्के वाढीला मंजूरी दिली आहे.

श्री.प्रमोद राठोड :दररोज पाणी दयावे ३०५० रू घ्यावे.

श्री.जगदीश सिध्द : १८००रू पाणीपट्टी करावी. तशी दुरूस्ती करारनाम्यात करावी.तसा प्रस्ताव आजच घ्यावा.ज्या सदस्यांच्या मागणी आहे जनतेच्या डिमांड आहे ते करारनाम्यात दुरूस्ती केल्याशिवाय मान्य करता येणार नाही.दुरूस्ती करावीच लागेच कुणी या संदर्भात कोर्टात गेले तर हे दाखवून देईल की सर्वांना मान्य आहे म्हणून बैठक घेतली.करारनामा दुरूस्ती करावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.प्रमोद राठोड :३०५०रू ऐवजी १८०० पाणीपट्टी असावी. केलेली वाढ नागरीकांना मान्य नाही.

मा.उपमहापौर :सभागृहाच्या वतीने मा.महापौर यांना विनंती की आजची सभा तहकूब करावी उद्या ही सभा बोलवावी.

मा.महापौर :शहरातील नागरीकांना पाण्यासाठी त्रास होणार नाही जास्तीत जास्त पिण्याचे पाणी कसे देता येईल. या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल.पाणीपट्टीची वसुली महानगरपालिका करेल. आजची सभा तहकूब करून उद्या सकाळी ११.०० वाजता सभा घेण्यात येईल.

या बरोबर मा.महापौर यांनी आजची सभा तहकूब केल्याचे जाहीर केले.

(महबुबखॉ पठाण)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद